
▪ वर्ष:५ वे ▪ अंक: १ ला ▪ जानेवारी २०२०▪ किंमत:३० रूपये

मासिक

# शिक्षण यात्री



स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या,
अनंत अडचणींवर मात करत मुलींसाठी पहिली
शाळा सुरू करणाऱ्या, पहिल्या शिक्षिका
क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना
विनम्र अभिवादन !



# भावबंध...

संधी, सन्मान नेतृत्वाला, ख्याती अनेक हाताला
हात हजारो साथीला, सज्ज वंदन्या मातीला ॥

फेरफटका परिसराचा, ठाव घेता कानाकोपरीचा
येई अंगावर शाहारा, वाटे सुरु करावा पहारा ॥१॥

खजिना घाणीचा हाताला, कसा कुणी बरे सांभाळीला
कधी कुणाची दौलत, कशी पडली हो अडगळीला ॥२॥

चाक पूसते मातीला, किती किती म्हणून झिजला
कार्यभाग हा संपला, मग कोण विचारी आम्हाला ॥३॥

असा कसा हा हिशोब, असा कसा हा संवाद
संगिनीचा माझ्या परि, काय होता तो अपराध ॥४॥

व्यथा पाहून घाणीची, काळजात चरिर् माझ्या
पुटपुटली तशी कानात, वेळ नको लावू राजा ॥५॥

संग माझा घाणीशी, कसा सखी परि झाला
तिच्या बरं मुक्तीसाठी, जीव उतावीळ झाला ॥६॥

– डॉ. पुरुषोत्तम भापकर (भा.प्र.से)



अक्षरचित्र-विष्णू थोरे

वाचन लेखन चळवळीला वाहिलेले मासिक

वर्ष : ५ वे

अंक:१ला जानेवारी २०२०

॥ ज्ञानम् सर्वजण हिताय ॥

• मानद संपादक •
सुभाषदादा कुलकर्णी

• कार्य.संपादक •
संदेश नंदकिशोर हजारे

• संपादन सहाय्य •
प्रा.डॉ.माधव कदम
युवराज माने

•प्रतिनिधी सहाय्य•
**पुणे**- रमेश काळे, **मुंबई**- जयपाल गिरासे, **नाशिक**-किरण पाटील, **सोलापूर**- उमेश काळे, **औरंगाबाद**- रवि गारूडकर, **परभणी**- युवराज माने, **जळगांव**- प्रविण माळी, **नंदुरबार**- तुकाराम धनगर, **अमरावती**- रूपेश माने, **कोल्हापूर** - गुलाब बिसेन,

• मुखपृष्ठ •
जिल्हा परिषद,प्राथमिक शाळा पारडी,ता.सेलू जि.परभणी येथील वाचनमग्न विद्यार्थी

• अंक मांडणी •
प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे

- लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी
- पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील
- सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत

# अंतरंग...

३ सांगकामे व कामसांग्ये तयार करणारे शिक्षण
५ आनंदाचं झाडं...
९ कृत्रिम पाऊस...
१२ अशैक्षणिक कामांचे ओझे...
१४ हेळसांड शारिरीक शिक्षणाची...
१६ मैदान गाजविणाऱ्या सावित्रीच्या लेकी...
१८ माझी कथा-मदत...
१९ मागे वळून पाहतांना..
२० माझी शाळा माझा उपक्रम...
२२ नाविण्यपूर्ण उपक्रम...
२४ शासन निर्णय/शिक्षणवार्ता...

**मासिका विषयी ...**
जानेवारी २०२०
नोंदणी क्रमांक RNI No.MAHMAR2015/67226
वर्गणी : वार्षिक₹ ३५०, द्विवार्षिक₹ ७००, त्रैवार्षिक १०००,
संपर्क : शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५.
चलभाष : 8208301001 Email:shikshanyatri11@gmail.com

# संवादकीय

आदरणीय

गुरूजी

सप्रेम नमस्कार!

कसं काय चाललयं तुमचं? गुरूजी तुम्हाला सर म्हणत नाही याचं वाईट वाटुन घेऊ नका. गुरूजी या शब्दालाच मला हेवा वाटतो आणि शब्दही आवडतो. जुन्या गुरूजींचेच प्रतिबिंब मी तुमच्यात पहातो. असो.

परवाच एक बातमी वाचनात आली. म्हणे सरकार आता लहान शाळांना पाच हजारच रूपये अनुदान देणार. खर्चायला नि तेही एका वर्षाचे ! आपल्या सरकारी शाळा म्हणजे ना तोंड दाबुन बुक्क्याचा मार? कसं शक्य आहे वर्षभर पाच हजारात धकवंनं? शाळा म्हणजे एक कुटूंबच की! वीजबिल आहे, पाणी आहे, झाडू आहेत, स्टेशनरी आहे, सुई दोरा आहे, खडू आहे अशी यादी लांबवली तर मी ती पाच हजाराच्या दुपटी-तिपटीत जाईल. पण तीस मुलांपर्यतच्या शाळांना पाच हजारांनी बोळवण झाली म्हणायची.

गुरूजी, हे फक्त तुम्हीच करू शकता. काटकसरीचा गुणधर्म उगाच देवाने गुरूंजाना नाही दिला. आणि सरकारलाही या गुणधर्माची आठवण झाली असावी.

शाळेचा खर्च कस भागवायचा या विचारात असतांना मतदान केंद्रस्तरिय अधिकारी (बी.एल.ओ) च्या कामाचे ओझेही वाढले वाटते. घरोघरी फिरा. मोबाईल ॲप द्वारे मतदारांची माहिती भरा. ऑनलाईन किचकटच काम ! अहो, माझ्या शेजारी बी.एल.ओ आलेले पाहुन मी भेटण्यास गेलो तर पाऊण तासापासुण सपुर्ण कुंटूबाची माहिती भरत असल्याचे कळाले त्यात मोबाईल रेंजची समस्या! म्हणुन समस्त गुरूजी वर्गाचा शैक्षणिक कामाचा बोजा कसा उतरणार प्रश्नच आहे.

शैक्षणिक-अशैक्षणिक कामाच्या व्यापात आपला विद्यार्थी मात्र कोरी पाटी घेऊन उभा आहे हे आपल्याचा कळतेय मात्र प्रशासनाला नाही? हे मला सुद्धा कळतच नाही.

असो शासनाकडे आपण या गोष्टींचा नक्की पाठपुरावा करूया. पाच हजारात शाळा चालवणार कशी? या प्रश्नांसह सरकारदरबारी आपले आर्जव कळेलच. तरी आपणही कडू-गोड बातम्या कळवत चला. आपल्या प्रतिक्रीये च्या अपेक्षेत.

शिक्षणयात्री

टिप : शैक्षणिक लेख,विचार,अनूभव,तसेच स्वरचित कथा कविता पाठवावयाचे असल्यास शिक्षणयात्री shikshanyatri11@mail.com या मेलवर पाठवावा. सोबत स्वत:चे नांव,पत्ता,शाळा,पासपोर्ट साईज फोटो पाठवावा. वर्गणी चेक/डि.डी./मनीऑर्डर 'शिक्षणयात्री' या



**नीला आपटे**
विनोबा आश्रम,गागोदे
९४०५९२४२२७.

# सांगकामे व कामसांग्ये तयार करणारे शिक्षण

इ. स. १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. देशाची नव्याने उभारणी करण्याचे काम सुरू झाले. विनोबांनी शिक्षण विषयक आपले विचार मांडताना म्हटले होते की, जसे नवे राज्य आल्यानंतर आपण नवा झेंडा स्वीकारला, तसेच नव्या राज्याचे नवे शिक्षणही निर्माण केले पाहिजे. पारतंत्र्याच्या काळात निर्माण झालेली शिक्षण व्यवस्था ही लोकांना गुलाम राहण्यास भाग पाडणारी व तशीच मानसिकता निर्माण करणारी, त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांना - इंग्रजांना राज्य चालविण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये शिकविणारी अथवा विकसित करणारी अशी होती. ती पूर्णपणे बदलून स्वतंत्र देशाचे परिपूर्ण नागरिक घडविणारी वेगळी शिक्षण व्यवस्था असणे ही खरंतर काळाची गरज होती. त्यावेळच्या शिक्षण व्यवस्थेचे दोष सांगताना विनोबा म्हणाले होते की,आजच्या शिक्षण व्यवस्थेमुळे दोन प्रकारचे लोक निर्माण होतात सांगकामे व कामसांग्ये. हे शिक्षण घेणारा एकतर स्वतःचे डोके न चालवता, निर्बुद्ध पणे सांगितलेले काम करतो, नाहीतर खुर्चीवर बसून दुसऱ्याला कामे सांगतो. या प्रकारच्या शिक्षणामुळे लोक अशिक्षित राहतात नाहीतर कुशिक्षित होतात. अशिक्षित म्हणजे स्वतःचे डोके न वापरणारा, विचार न करणारा असा बेवकूफ माणूस तर कुशिक्षित म्हणजे निरुपयोगी शिक्षण घेतलेला पण हाताने काम करू न शकणारा बेकार माणूस.

विनोबांचे हे विधान आज एकविसाव्या शतकातही तंतोतंत जुळणारे आहे. आज आपण पाहतो की सहा-सात वर्षे शाळेला सातत्याने गेलेली सहावी - सातवीतील मुले अस्खलितपणे वाचू शकत नाही किंवा वाचता आलं तरी त्याचा अर्थ त्यांना लागत नाही. पाठ्यपुस्तकात समाजशास्त्र, समाज विज्ञान वाचतात, परंतु भोवतालच्या समाजात काय काय चाललं आहे याचं आकलन त्यांना होत नसतं. भोवतालच्या परिस्थितीचा विचार स्वतंत्रपणे करण्याची कुवत आणि सवय नसते. विनोबांच्या शब्दात अशा प्रकारचं शिक्षण हे बेवकूफ बनवणारं शिक्षण आहे. थोडा वेगळ्या अंगाने विचार करून पाहू. दहा वर्षे शाळा, नंतरची पाच-सात वर्षे महाविद्यालय, अशी आयुष्याची पंधरा-वीस वर्षे शिक्षण घेण्यात घालविलेला माणूस वीस वर्षानंतर काय करतो? तर हातात पदवी घेऊन नोकरीच्या शोधात वणवण फिरतो. नोकरी मिळाली तर ठीक, नाहीतर अक्षरशः हाती 'शून्य' लागते अशी परिस्थिती आहे. आजचे शिक्षण मुलांना स्वतःचा चरितार्थ चालविण्यासाठी किंवा स्वतःसाठी रोजगार निर्माण करण्यासाठी तयार करू शकत नाही. ही शिक्षणाची दुरावस्था म्हणजेच विनोबांच्या शब्दात कुशिक्षण. म्हटलं तर शिक्षण आहे, पदवी आहे, परंतु त्या शिक्षणाचा काहीही उपयोग नाही. शून्य उपयोग असणारे हे शिक्षण म्हणजेच कुशिक्षण. शालेय जीवनात वेगवेगळ्या विषयातील प्रश्नोत्तरांचं पाठांतर करायचं आणि आणि परीक्षेच्या वेळेस कागदावर उतरवायचं इतकाच शिक्षणाचा मर्यादित अर्थ झाल्यामुळे, एखादी कविता, संकल्पना, वैज्ञानिक नियम, सिद्धांत कधी संदर्भासाठी मुलांना विचारल्या तर लगेच उत्तर मिळतं की, हे आम्हाला मागच्या वर्षी होतं, यावर्षी नाही. म्हणजेच, आधी मिळविलेल्या पूर्वज्ञानाचा संदर्भही आत्ताच्या किंवा पुढच्या ज्ञानाशी लावला जात नाही. कालचं ज्ञान आज निरूपयोगी..... इतका तुटकपणा, निरर्थकपणा शिक्षणामध्ये आला आहे. या शिक्षणातून नेमके काय साध्य होते, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. हा प्रश्न आजचे शिक्षण पाहून जरी आपल्या मनात येत असला तरी साठ सत्तर वर्षांपूर्वीच विनोबांनी दूरदृष्टीने विचार करून याचा तोडगा सुचविला आहे - शिक्षण पद्धती मुळापासून बदलण्याचा, औपचारिक शिक्षणामध्ये ज्ञान आणि काम यांचा मेळ साधण्याचा. सांगकामे आणि कामसांग्ये तयार करणारे शिक्षण हे विनोबांचे शब्द तर खूपच बोलके आहेत. जो औपचारिक शिक्षण घेत नाही तो फक्त श्रमाची कामे बुद्धी न वापरता करण्यात आपला जन्म घालवतो व जो उच्च शिक्षण घेतो, तो अधिकारी म्हणून खुर्चीवर बसून दुसऱ्याला आदेश देऊन कामे करून घेतो. श्रमजीवी आणि बुद्धिवादी असे दोन स्वतंत्र गट निर्माण झालेले आहेत कारण आजच्या औपचारिक शिक्षणामध्ये ज्ञान आणि कर्म यामध्ये संबंधच राहिलेला नाही. पुस्तकी ज्ञान व बौद्धिक विकास हेच शालेय शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट. मनुष्याची कार्यशक्ती,

कार्यकौशल्य वाढविण्यासाठी, औपचारिक शिक्षणात काहीच प्रयत्न होत नाहीत. त्यामुळे कार्याचे तत्वज्ञान सांगणारा आणि प्रत्यक्ष कार्य करणारा हे वेगळे झाले आहेत. यातील विरोधाभास असा की जागेवर बसून कृती करण्याचे तांत्रिक किंवा तात्विक बाजू बौद्धिक दृष्ट्या ग्रहण केलेला माणूस हा प्रत्यक्ष हाताने शरीराने काम करणाऱ्या माणसापेक्षा जास्त श्रेष्ठ व प्रतिष्ठेचा मानला जात आहे. त्यामुळे आजची शिक्षण व्यवस्था ही फक्त सांग कामे व काम सांगे तयार करत नसून एक वर्णव्यवस्था वर्गव्यवस्था नव्याने निर्माण करत आहे हे आपल्या समाजाला घातक आहे म्हणूनच विनोबा म्हणतात त्याप्रमाणे सांगकामे व काम सांगे निर्माण करणारी पारतंत्र्याच्या काळात निर्माण झालेली शिक्षण व्यवस्था बदलून स्वायत्त व स्वावलंबी समाज बनवणारी नवीन शिक्षणव्यवस्था निर्माण व्हायला हवी.

## शिक्षणवार्ता...

# पाच हजारात शाळा कशी चालणार?

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात समग्र शिक्षा अभियान राबवले जातेय. या अगोदर सर्व शिक्षा अभियान या योजने अंतर्गत शाळा अनुदान मिळत होते. शाळा अनुदाने, देखभाल-दुरस्ती या अंतर्गत शाळेचा वर्षभर खर्च चालत असे. दहा ते पंधरा हजाराच्या अनुदानात खर्चाचा मेळ घालता येत नव्हता. म्हणूनच अनुदान वाढवून मिळावे अशी मागणी सातत्याने होई. याचाच विचार होऊन समग्र शिक्षा अभियान या योजनेत विद्यार्थी संख्या निहाय अनुदान वाढवून मिळाले खरे. मात्र तीस पटसंख्येच्या आतील शाळांचा प्रश्न गंभीर झाला आहे. कारण त्या शाळांना वर्षात खर्चासाठी केवळ पाच हजार मिळाले आहेत. म्हणूनच महाराष्ट्रभरातील शाळांना फटका बसल्याने मुख्याध्यापक वर्गात नाराजी पसरली आहे.

पटसंख्येआधारे अनुदान वाटप झाले असले तरी सर्वच शांळंचा लागणारा खर्च कमी अधीक असतो. वीजबीलचा मुद्दा तर कळीचा आहे. बहुतांश शाळा डिजीटल झाल्यात. या शाळांचा वीज पुरवठा सुरू रहाण्यासाठी वीज बीलाचा भरणा करतांना शिक्षकांना नाकीनऊ येते. वीजबील सरकार भरणार अशा आशयाच्या केवळ बातम्याच वाचायला मिळतात. पण अंमलबजावणी होत नाही. प्रति महिना हजाराच्या आसपास वीजबील थकल्याने अनेक शाळांचा वीज पुरवठा बंद असल्याचे वास्तव आहे.

नियमीत पाणी पुरवठा असो, शाळा स्वच्छता, किरकोळ दुरूस्ती, स्टेशनरी अशा अनेक बाबींचा खर्च शिक्षकांना करावा लागतो. यातील बहुतांशा बाबी वर्षभरात नियमीत खरेदी कराव्या लागतात. झेरॉक्सचा खर्च ही काही कमी नाही. ऑनलाईनचा गोंधळ आहेच. विविध शिष्यवृत्तीचे फॉर्म असो कि ऑनलाईनची माहिती नोंदणी यासाठी सायबर केंद्रावर जाऊन खर्च करावाच लागतो. मग शिक्षक या खर्चाचा ताळमेळ कसा साधनार?

पाच हजाराने अनुदान मिळालेल्या शाळा या आदिवासी ग्रामीण भागातील आहेत. येथील सामान्य गरीब कुटूंबातील विद्यर्थ्यांना लागणारे शैक्षणिक साहित्य शिक्षकांनाच पुरवावे लागते. शिक्षक ही स्वत: सामजिक दायित्व दाखवत स्वत: पदरमोड करतांना दिसतात. असा सारा प्रपंच सांभाळणाऱ्या द्विशिक्षकी शाळांच्या मुख्याध्यापकांना या पाच हजाराचा फटका बसतोय. समग्रच्या अनुदानात वाढ व्हायला हवी. नाहीतर अप्रत्यक्षपणे मराठी जिल्हा परिषदेच्या शाळांना बकाल अवस्था प्राप्त होईल.



**युवराज माने**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पार्डी
ता. सेलू जि. परभणी ७५१७४७८५७०

# शाळा जेव्हा लोकोत्सव बनते..

निसर्गात असते तेच वैविध्य सहा वर्षाच्या मुलांमध्येही असते. शाळेत अशा वेगवेगळ्या वयोगटातील मुलांना एकाच धाग्यामध्ये गुंतवत जाणं व त्यांना एका चाकोरिबद्ध पद्धतीने शिकण्यास प्रवृत्त करणं हे कुठेतरी मनाला पटत नव्हतं. आदिवासी नक्षलग्रस्त भागात जंगलाच्या कुशीतअसलेली माझी पलखेड्याची शाळा. तसं पाहिलं तर शाळेतील या मुलांना रमून ठेवण्यामध्ये खुप मोठी कसरत करावी लागायची .निसर्गातील या शिक्षणासोबतच मुलांना ज्ञानाची शिखरे सर करता यावीत ,जगातील घडामोडीही लेकरांनी सहज शिकाव्यात. हे एक नवं स्वप्न घेऊन पुढचा प्रवास सुरु झाला. मला जे साधायचे आहे ते लोकांच्या समोर नेताना ते कितपत त्यांना कळत होतं हे पहाण्यासारखच होतं. हे सर्व करत असताना मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचे इंद्रधनुष्य समोर उलगडत जात होतं.आणि ते पाहताना कुठलाही कंटाळा येत नसे.गावकऱ्यांना शाळेप्रती निर्माण झालेली अस्मिता लक्षात घेऊन नव्या शिक्षणाच्या वाटा आपल्याही गावातील लेकरांनी चोखंदळाव्यात असा एक सूर पालकांच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न सुरू झाला.

ज्या योगे मुलांचं कुतूहल जागं होईल, मनापासून एखादी गोष्ट करण्याची इच्छा होईल एवढं कौशल्य गुरूजीत हवं. हे कुठेतरी जाणून असल्यामुळे मला माझी मुलं जगाच्या तुलनेत कुठेही मागे पडू नयेत असं वाटू लागलं. शिक्षणाच्या वाटा मुलांना उपलब्ध करून देता आल्या पाहिजेत या अनुषंगाने ज्ञान इंटरनेटच्या मदतीने मुलांना शाळेमध्ये उपलब्ध व्हावे यासाठीची तळमळ मी व माझ्या सहकारी कु.कुसुम भोयर करू लागलो. यासंदर्भात बोलू लागलो.'डिजिटल शाळा' म्हणजे काय? हे गावकऱ्यांना कळेना झालं.. मी त्यांना या नव्या शिक्षण पद्धती विषयी बोलत होतो. शाळेच्या माध्यमातून मुलांना काय शिक्षण घेता येईल याविषयी बोलत होतो परंतु म्हणावा तसा प्रतिसाद लाभत नव्हता.एके दिवशी मा.गटविकास अधिकारी बाळकृष्ण इंगळे यांची भेट झाली .बोलता बोलता सहज त्यांच्या समोर हा विषय मांडला व त्यांना माझ्या शाळेवर येऊन सर्व गावकऱ्यांना यासंदर्भात मार्गदर्शन करावे अशी विनंती केली .मा.इंगळे साहेबांनीही सहजरित्या होकार दर्शवला . म्हणतात ना , 'इच्छा असल्यास सर्व जग तुम्हाला मदत करण्यास धावून येत असतं.'

गटविकास अधिकारी आपल्या गावात सर्व गावकऱ्यांशी संवाद साधण्यासाठी येत आहेत अशी सूचना गावकऱ्यांना दिली . गावकऱ्यांनी मनावर न घेता आपापले काम चालू ठेवले कारण ग्रामसेवक व शिक्षक या सरकारी कर्मचाऱ्यांच्या शिवाय गावात कुणी इतर व्यक्ती येत नव्हता. ठरलेल्या दिवशी इंगळे साहेब गावी पोहोचले. परंतु गावातील एकही पालक हजर झाला नाही. मग आम्ही बँड पथक काढलं आणि प्रत्येक पालकाच्या दारात जाऊन बँड वाजवून त्यांना आमंत्रित केलं .तेव्हा गावातील सरपंच व इतर काही पालक उपस्थित झाले. सरपंच व इतर पालकांना घेऊन मा.इंगळे साहेब स्वतः गावात पालकांना बोलवण्यासाठी फिरू लागले .मग गावातील बाया पोरां सहित शाळेमध्ये सभा भरली. सभेमध्ये मा. इंगळे साहेबांनी गावकऱ्यांच्या अगदी हृदयाला हात घातला. शिक्षणाचे महत्व पालकांना पटवून दिलं. पालकांना विश्वासच बसत नव्हता की आमच्या गावात साहेब आलेत आणि ते आमच्या लेकरांसाठी इतकी तळमळीने सांगत आहे. जेव्हा साहेबांनी , हा गाव माझा आहे .आणि या गावातील लेकरांच्या भविष्यासाठी माझ्याकडून ही नगदी स्वरूपात ४००० हजार रुपयांची राशी जमा करावी असं म्हटल्यानंतर गावकऱ्यांच्या मनात चैतन्य निर्माण झालं. नवीन तंत्रज्ञानानुसार शिक्षण का आवश्यक आहे .ते कशा पद्धतीने गावात उपलब्ध होईल या विषयावर मार्गदर्शन झाल्यानंतर गावकऱ्यांना हा मुद्दा समजला. गावातील सरपंच व इतर शिक्षित मंडळी एकत्र येऊन लागलीच कामाला लागली आणि दोन दिवसात सर्व लोकांनी मिळून ३०००० रुपये जमा करून दिले. सदरील या घटनेची एक छोटीशी वर्तमानपत्रात बातमी देण्यात आली.'पलखेडा शाळा डिजिटल होणार!' 'आदिवासी गोंडी बांधवांची मुलंही आता प्रगत तंत्रज्ञानाची धडे शाळेत घेणार.' वर्तमानपत्रात आलेली ही बातमी गोंदिया जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी

डॉ. विजय सूर्यवंशी यांनी वाचली व आपल्या पी ए ना सूचित केलं की,या शाळेचा पत्ता ,येथील मुख्याध्यापकांचा नंबर मिळवा. दुसऱ्याच दिवशी शिक्षणप्रेमी जिल्हाधिकारी डॉ.विजय सूर्यवंशी साहेबांचा चलभाषवर फोन आला .ते म्हणाले, एका छोट्या गावात नवीन तंत्रज्ञान युक्त शिक्षण देण्याचं काम तुम्ही लोक उभे करत आहात हे मला मनापासुन आवडलं. आपण खूप मोठं काम करत आहात. या कामासाठी माझ्या सदैव शुभेच्छा असतील. या तुमच्या कामासाठी माझ्याकडून ५००० रुपयांची मदत आपण स्वीकारावी.आपण आदिवासी बांधवांनी मोठ्या शहराच्या आजूबाजूच्या शाळाच्या डोळ्यांमध्ये अंजन घालण्याचे काम करत आहेत . अशा गावकरी बांधवांच्यासोबत संवाद साधायला मला नक्की आवडेल असंही ते म्हणाले. हा संवाद गावातील सरपंच ,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व इतर गावकऱ्यांना ऐकवला .तेव्हा गावातील सर्व लोकांच्या आनंदास पारावार उरला नाही .त्यांनी डिजिटल शाळेचे उद्घाटन समारंभ डॉ.विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्याचे ठरविले.

डिजिटल शाळेचा हा प्रवास सुरु झाला होता परंतु आर्थिक बाबींमध्ये आणखी आम्ही कमी पडत होतो. गावकऱ्यांनी जसं जमेल तशी रक्कम जमा करून दिली मी व माझ्या सहकाऱ्यांनी खारीचा वाटा ऊचलला. केंद्रप्रमुख आरगडे यांचाही या कामांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान आम्हाला मिळालं. डिजिटल शाळेचे उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी साहेबच असतील असा प्रस्ताव लोकांनी मांडलेला. साहेबांनी हा प्रस्ताव सहजरित्या स्वीकार केला .

एका खेडेगावात जिल्ह्याचा जिल्हाधिकारी येत आहे असं म्हटल्यानंतर गावकऱ्यांच्या आनंदास पारावर उरला नाही.यावर गावकऱ्याचा विश्वास बसेना. आजपर्यंत त्यांनी कधीही लाल दिव्याची गाडी पाहिली नव्हती. शाळेच्या माध्यमातून लोकांच्यात एक वेगळंच चैतन्य पसरले गेलं. २ ऑक्टोबर गांधी जयंतीच्या निमित्ताने डिजिटल शाळेचा उदघाटन समारंभ नियोजित करण्यात आला . पत्रिका प्रसिद्ध करण्यात आली. त्यावेळेस पंचक्रोशीतील लोकं आमच्या पत्रिका पाहून हसत. पलखेडासारख्या छोट्या गावात जिथे जायला साधा रस्ता नाही ,तिथं कलेक्टर येणार !ही त्यांनाही विश्वास न बसणारी गोष्ट होती. परंतु मला व माझ्या गावकऱ्यांना डॉ.विजय सूर्यवंशी सरांवर विश्वास होता. आपल्या गावात एक आय ए एस अधिकारी येत आहे हा आनंद सर्व घराघरात होता .ठरल्याप्रमाणे गावकऱ्यांनी पूर्ण गाव स्वच्छ केलं. शाळेमध्ये आम्ही दोनच शिक्षक पण गावकऱ्यांनी इतकी मोलाची साथ दिली की,शाळा नवरीसारखी नटवली सरपंच सौ.चंद्रकलाबाई सयाम आपल्या सर्व सदस्यांना घेऊन शाळेमध्ये सडा ,रांगोळी करत होत्या .गावकरी इतर बाबींमध्ये ,साफसफाईमध्ये मदत करत होते . तोरण पताका बांधत होते. शाळेतील चिमुकले मुले येणाऱ्या पाहुण्यांच्या स्वागतासाठी पुष्पगुच्छ तयार करत होते. एक मोठा उत्सव असल्यासारखंच वाटत होतं. आज हे गावकऱ्यांच्या मनातलं एक सन्मानाच केंद्र बनलं होतं. २ ऑक्टोबरचा दिवस उजाडला परंतु साहेबांना येणं शक्य नाही असं संदेश आला. गावकरी तरीही आपल्या मुद्द्यावर ठाम होते .त्यांनी दुसऱ्या दिवशी येण्याची साहेबाना विनंती केली .डॉ. विजय सूर्यवंशी सरांनी लगेच कबूल केलं . ३ ऑक्टोबर रोजी सकाळी गावकऱ्यांनी अखख गाव रांगोळी रंगवलं होतं .घराघरात, दारात रांगोळी काढल्या होत्या ,सडा-सारवण केलेलं होतं .शाळा वेगवेगळ्या पताकांनी आणि तोरणांनी सजवली होती.गोंडी बांधवांनी गोंडी नृत्य बसवलं होतं .गोंडी नृत्याच्या गायनाच्या तालावर आपल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांचे जंगी स्वागत करण्याचं त्यांनी ठरवलं होत. एक अभूतपूर्व सोहळा गावकरी शाळेच्या माध्यमातून पहात होते .एक आय ए एस अधिकारी आवल्या गाड्यांच्या ताफ्यासह पलखेडाच्या दिशेने पोहोचले .गाडीतून उतरताच माझ्या शाळेतील चिमुकल्यांनी डॉक्टर विजय सूर्यवंशी यांचं कुंकुमतिलक करून स्वागत केलं .स्वागताच बक्षीस म्हणून एक हजार रुपये आमच्या चिमुकल्यांना साहेबानी दिल. लागलीच दिले. पंचक्रोशीतील अनेक लोक ,प्रसारमाध्यम, टीव्ही चालवाले, पत्रकार सर्वजण पोहोचलेले होते .गावकऱ्यांनी गोंडी गीतांनी डॉ. विजय सूर्यवंशी सरांचं गावाच्या प्रवेशद्वारावर स्वागत केलं. पळसाची पान ,गोंडी बांधवांच्या अस्मितेच्या वेगवेगळ्या वस्तूंद्वारे जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी याचं अभूतपूर्व स्वागत होत होतं. हे

एवढ्यावरच न थांबता गावकऱ्यांनी साहेबासाठी बैलगाडी सजवली होती.गावकऱ्यांनी बैलगाडीत बसण्याची विनंती केली बैलगाडीमध्ये डॉ. विजय सूर्यवंशी साहेब बसल्यानंतर तिच्यासमोर गोंडी नृत्याच्या तालावर संपूर्ण गावभर जिल्हाधिकार्यंची मिरवणूक काढण्यात आली.इतर अधिकारी व जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिक्षणाधिकारी ,जिल्हा माहिती अधिकारी, शिक्षण अधिकारी शिक्षण सभापती या सर्वांनाच जंगी स्वागत गावकऱ्यांनी केलं .गावाची ही सजलेली रचना, रांगोळ्या, सडा-सारवण पाहून सर्व आलेल्या पदाधिकारी प्रभावित झाले. शाळेच्या प्रवेशद्वारावर सूर्यवंशी सरांनी शाळेकडे एक डोळे भरून कटाक्ष टाकला .सजलेली शाळा, शाळेमधील जागोजागी मांडलेल्या वृक्षांच्या कुंड्या,लाकडी कुंपण असलेली आमचीही ज्ञानदायी शाळा अनेक लोकांच्या येण्यानं आनंदी झाली होती. सर्वजण शाळा पाहत पाहत आत मध्ये आले तेव्हा सर्व चिमुकल्यांनी स्वतः बनवलेल्या पुष्पगुच्छनी, ग्रीटिंग कार्डनी सर्वांचे स्वागत केलं. मुलांनी वेगवेगळे राबवलेले उपक्रम दर्शनासाठी मांडण्यात आले होते. मुलांनी तयार केलेल्या वस्तू, चित्र आजपर्यंत त्यांनी राबवलेल्या उपक्रमांची माहिती सर्व मान्यवर डोळे भरून पाहत होते.एवढेच नाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर बाल वाचनालय छोट्याशा वर्गखोलीत उभा केलेला पाहिलं तेव्हा डॉक्टर विजय सूर्यवंशी सरांनी तोंड भरून कौतुक केलं . विजय सूर्यवंशी सरांनी बाल वाचनालयातील अनेक पुस्तके उघडून पाहिली .शाळेतील प्रत्येक कोपरान् कोपरा वेगळ्या पद्धतीने माडण्यात एक कल्पकता वापरली होती .हे सर्व पाहून शिक्षण प्रेमी जिल्हाधिकाऱ्याचे मन आनंदाने का भरून येणार नाही ? एखाद्या मोठ्या जत्रेचे स्वरूप गावाला प्राप्त झालं होतं .लहान थोरा सहित मंडळी व गावाच्या आजूबाजूची मंडळी, केंद्रातील सर्व शिक्षक या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

गावातील वृद्ध म्हातारी माणसं डोळे भरून डॉ.विजय सूर्यवंशी यांच्याकडे पाहत होते. काही आजोबांनी त्यांना बोलण्याची विनंती केली. अनेक आजोबा समोर येऊन त्यांचा हात हातात घेऊन धन्यवाद देत होते. सूर्यवंशी सरांनी आपल्या वाणीतुन गावकऱ्यांना मार्गदर्शन केलं .माझ्या सर्व गावकरी बांधवांनो, खऱ्या अर्थाने तुम्ही अर्थतज्ज्ञ आहात .तुम्ही योग्य ठिकाणी पैसा गुंतवत आहात .तुमची ही शिक्षणाची दृष्टी मला मनापासून आवडली म्हणूनच मी तुमच्या भेटीसाठी आलो आहे . आज माझा तुम्ही जो सन्मान केला आहे तो जीवनभर मी कधीच विसरू शकणार नाही.आजपासून पलखेडा हे गाव माझं आहे.जोपर्यंत मी जिल्ह्याचा जिल्हाधिकारी आहे तोपर्यंत माझं गाव आहे .आपणास कुठलीही अडचण येत असेल तर मी या ठिकाणी सेवेसाठी आहे. हे विधान ऐकल्यानंतर गावकऱ्यांची मन भरून आलं. गावातील वेगवेगळ्या अडचणी व शाळेसाठी ची आवार भिंत त्यांनी त्याच कार्यक्रमात मंजूर करून दिली .याप्रसंगी जिल्ह्याची शिक्षण अधिकारी, सभापती यांनीसुद्धा गावकऱ्यांचे तोंडभरून कौतुक केलं. एका छोट्या खेडेगावांमध्ये हा शाळेच्या माध्यमातून उभा राहिलेला लोकोत्सव लोकांना प्रेरणादायी ठरणारा होता .

काही गोष्टी सर्वांच्या भल्यासाठी करायच्या असतात आपल्याला त्याचा काही फायदा होणार नसेल तरीही आपल्या मदतीने एखादी गोष्ट उभी होत असेल तर त्याचा आनंदही फार मोठा असतो .

हेच यामधून सूर्यवंशी सरांना दर्शवायचा होतं की काय!.. अतिशय थाटामाटात आमच्या नव्या शिक्षणाचं स्वप्न साकार झालं. मुलांच्या डोळ्यात माध्यमातून उभं राहिलेलं तेज हे पाहण्यासारखे होतं. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांमध्ये व टीव्ही चॅनल्स मध्ये गोंदिया जिल्ह्यातील पहिली डिजिटल शाळा पलखेडा. जिल्ह्यातील पहिली डिजिटल शाळेचा मान पलखेडा शाळेस. अशा स्वरूपाच्या विविध बातम्या वर्तमानपत्रातून पोहोचल्या. ही माझ्या चिमुकल्यांसह गावकऱ्यांना अभिमानाची गोष्ट होती काहीच दिवसात डॉ. विजय सूर्यवंशी सरांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्फत सर्व शिक्षकांना डिजिटल शाळा पलखेडा पाहण्यास नियोजन करावे व इतर शाळेतही डिजिटल शाळा बनण्याचे कार्य सुरू करावं असं आदेश काढला. जिल्हाभरातील सर्व शिक्षक दर शुक्रवारी टप्प्या-टप्प्याने शाळा भेटीसाठी येऊ लागले..... ज्या गावात यायला नीट रस्ता नव्हता ,ज्या गावात शाळेत शिक्षक यायला तयार नव्हते . त्या गावात जिल्ह्यातील सर्व अधिकारी, पदाधिकारी व शिक्षक आणण्याचा मानस कार्यातून संपन्न झालं.शाळा गावात पोहोचली ,गावाची

आवडती बनली .गावकऱ्यांसाठी शाळा हा लोकोत्सव बनली. आता लोकं शाळेसाठी स्वतः होऊन मदत करू लागले.

## शिक्षणवार्ता...

### नेट सेट परिक्षांसाठी स्टायपेंड मिळणार

छत्रपती शाहू महाराज संशोशन प्रशिक्षण व मानव विकास संस्था म्हणजे सारथी यांच्यावतीने मराठा, कुणबी, मराठा–समाजातील नॉनक्रिमीलेयर उमेदवारांना सेट,नेट या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी औरंगाबाद येथे नि:शुल्क मार्गदर्शनाची सुविधा मिळणार असून दरमहा तीन हजार रूपये स्टायपेंड दिला जाणार आहे. दरम्यान निवड झालेल्या सर्व उमेदवारांना पेपर १ व २ साठी मार्गदर्शन केले जाणार आहे.

### बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नोकरीची संधी

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल) आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (इग्नू) यांच्यामध्ये शैक्षणिक करार झाला. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर आता नोकरीही मिळणार आहे. काम करण्याचे ज्ञान शिक्षणाबरोबर मिळावे यासाठी पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आल्याचे एमकेसीएलचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत यांनी सांगितले. बारावी उत्तीर्ण, उच्चशिक्षण घेत असलेले विद्यार्थी यासाठी अर्ज करू शकतात. जुलै पासून या अभ्यासक्रमाची सुरूवात होणार आहे.

### दहावी बारावी परिक्षांचे वेळापत्रक जाहीर

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी बारावी परिक्षेचे अंतीम वेळापत्रक जाहीर केले आहे. यानुसार इयत्ता दहावीची लेखी परीक्षा ३ ते २३ मार्च या कालावधीत तर इयत्ता बारावीची लेखी परिक्षा १८ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२० या कालावधीत होणार आहे. यासोबत प्रात्यक्षिक परिक्षा, श्रेणी,तोंडी परिक्षा आणि इतर विषयांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे परिक्षेपूर्वी मंडळामार्फत शाळांना तसेच कनिष्ठ महाविद्यालयांना कळवण्यात येणार आहे. शिक्षण मंडळाचे ते वेळापत्रक पुणे,नागपूर,औरंगाबाद,मुंबई,कोल्हापूर,अमरावती,नाशिक,लातूर आणि कोकण अशा ९ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परिक्षांसाठी आहे.

### आता विद्यार्थ्यांचीही बायोमेट्रीक हजेरी

राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती डिजीटल पद्धतीने बायोमेट्रीक मशिनद्वारे होणार आहे. त्यासाठी पालघर, उस्मानाबाद,लातूर आणि बीड या जिल्ह्यांची तीन महिन्यांसाठी निवड करण्यात आलेली आहे. यामध्ये शासकीय आणि अनुदानित शाळांचा समावेश आहे. जिल्हानिहाय शाळांची यादी जाहीर करण्यात आली असून या संदर्भात ११ खाजगी कंपन्यांची नेमणूक करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्यावतीने निश्चित ग्रेड इंडेक्सनुसार राज्यातील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांची बायोमेट्रीक मशिनच्या माध्यमातून हजेरी घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा उपक्रम तीन महिन्यांसाठी प्रायोगिक तत्त्वावर ५ जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. त्यानंतर असा प्रकल्प राज्यातील इतर शाळांमध्येही राबविण्याचा विचार आहे.



**विनय र.र.**
पुणे
९४२२०४८९६७

# कृत्रिम पाऊस .... माणसा हाती?

कृत्रिम पाऊस पाडावा म्हणून अनेकदा कमी पाऊस झालेल्या प्रदेशातील लोक सरकारच्या मागे लागतात. यज्ञात भवती पर्जन्याः असे वेदात म्हणून ठेवलेले आहे. याचा अर्थ यज्ञ म्हणजेच यत्न किंवा प्रयत्न केले की पाऊस पडतो. आधुनिक विज्ञानाने सुद्धा पाऊस पाडण्याचे प्रयत्न चालू ठेवले आहेत. पाऊस पडण्यासाठी कोणत्या प्रकारचे वातावरण हवे याचा अभ्यास माणसाने वर्षानुवर्षे निरीक्षणे करून अनुमान काढून परंपरेने सर्वांसमोर मांडला.



साभार: आंतरजाल

**मानव निर्मित कृत्रिम घटक**

भारतात विशेषतः विशिष्ट कालखंडात पाऊस येतो त्याला आपण मोसमी पाऊस म्हणतो. जगामध्ये फारच थोड्या ठिकाणी मोसमी पाऊस पडतो. या अर्थाने जगामध्ये बऱ्याच ठिकाणी अवकाळी पाऊसच पडत असतो. आपल्याकडे अवकाळी पाऊस आला की एक संकट आले असे मानले गेले आहे कारण विशिष्ट कालमानात म्हणजे पावसाळ्यात नियमितपणे पाऊस पडण्याची आपल्याला वर्षानुवर्षाची सवय आहे. 'नेमेचि येतो मग पावसाळा – हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा' अशा कविता आपल्या कविंनी केल्या आहेत. उन्हाळा पावसाळा हिवाळा हे प्रमुख तीन ऋतू आपल्याला स्पष्टपणे दिसतात. अर्थात भारताच्या विविध भागात थोड्या फरकाने हे ऋतू येतात. कधी त्यात फार फरकही पडतो – उदाहरणार्थ भारतातल्या बहुतांश भागात पावसाळा असताना आग्नेय किनाऱ्यावरील तामिळनाडू राज्य पावसाविना राहते आणि मुख्य भारतात बहुतांश भागात थंडी किंवा हिवाळा असतो त्यावेळी मात्र तामिळनाडूत पावसाळा असतो. अशाप्रकारे भारतातच वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळ्या तऱ्हेने पाऊस पडत असतो. राजस्थानमध्ये पाऊस कमी पडतो पण तेथे उन्हाळाच इतर ठिकाणच्या पावसाइतका आनंदाने सण करून साजरा केला जातो. तिथल्या लोकांना माहिती आहे की जर ज्येष्ठ महिना तापला नाही तर पाऊस धारा येणार नाहीत त्यामुळे तेथे जेष्ठ महिन्यात जेवढा कडक उन्हाळा असेल तेवढा तिथल्या लोकांना आनंद होतो किंबहुना राजस्थान उन्हाळ्यात जितका तापेल तितका मोसमी पाऊस चांगला येईल चांगला होईल असा कयास असतो. महाराष्ट्र कर्नाटक सीमेवर असणारे पर्जन्यछायेतील काही भाग तापलेले गेले तर पूर्ण महाराष्ट्रात पाऊसमान चांगले राहते. आपण अशा गरम राहणाऱ्या भागांमध्ये पाण्याचा वापर करून किंवा कालव्यांच्या मार्गाने तिथे पाणी नेऊन तो भाग कमी तापेल अशी व्यवस्था केल्यामुळे इतर भागांमध्ये पाऊसमानावर विपरीत परिणाम झाला आहे. दुसऱ्या बाजूला हवेमध्ये बाष्प स्थिर होण्यासाठी आवश्यक असणारी पश्चिम घाटावरील वृक्षतोड बेमुर्वतखोरपणे झाली त्याचाही परिणाम पाऊसमानावर झाला. हे मानव निर्मित कृत्रिम घटक पाऊसमानावर परिणाम करत आहेत. मात्र याला आपण 'पाऊस माणसा हाती' म्हणत नाही... मग याला 'ना पाऊस माणसा हाती' म्हंटले पाहिजे.

**पाऊस येतो कसा?**

आपल्याला प्राथमिक शाळेतच पर्जन्यचक्र शिकवलेले असते. सूर्याच्या उन्हामुळे पाण्याची वाफ होते, ती हलकी असल्यामुळे वर वर जाते. वर हवा थंड

असल्यामुळे ती गोठते. तिचे ढग होतात. ते जड होऊन खाली येतात आणि पाण्याच्या थेंबांच्या स्वरूपात खाली पडतात. त्यालाच आपण पाऊस म्हणतो. वास्तवात पाऊस पडण्यासाठी आवश्यक असणारी पर्यावरणीय स्थिती काय आहे याचा अभ्यास खूपच बारकाव्याने करावा लागतो. पाऊस पडण्यासाठी ढग तयार व्हावे लागतात. ढग म्हणजे बारीक बारीक सूक्ष्म पाण्याचे थेंब. पावसाचे थेंब तयार होण्यासाठी पाण्याची वाफ लागते त्याचप्रमाणे गारवाही लागतो. हवेत बाष्प सामावून घेण्याची मर्यादा ओलांडली जावी लागते. ते पाण्याच्या सूक्ष्म थेंबांच्या रूपात अवतरते. थेंबानाही अवतरण्यासाठी काही आधार लागतो. निसर्गामध्ये अतिशय सूक्ष्म अश्या धुळीच्या कणांच्या आधार घेऊन हे बाष्पाचे थेंब अवतरतात. आकार वाढून एकत्र येतात काही मायक्रोमीटर आकाराचे थेंब मिलिमीटर आकारांमध्ये एकत्र आले की त्यातून पाऊस पडण्याची शक्यता वाढते. माणसाला याचे माप कळाल्यावर कृत्रिम पाऊस पडण्यासाठी माणसाने केलेल्या प्रयोगांमध्ये याबाबत प्रयोग करण्यात आले.

मानवाने १९४६ सालापासून कृत्रिम पाऊस पाडण्याच्या प्रयोगांना सुरुवात केली. विन्सेंट जोसेफ शॅफर याने पाऊस पाडण्याची पहिली कृती १३ नोव्हेंबर १९४६ रोजी केली. ऑस्ट्रेलियाच्या आग्नेय भागातील बाथरुस्ट प्रांतात जनरल इलेक्ट्रिक लॅब या कंपनीने १९४७ मध्ये कृत्रिम पावसाचा व्यावसायिक प्रयोग केला. असे प्रयोग अनेक देशांनी केले त्यामध्ये अमेरिका रशिया सुद्धा आहेत

कृत्रिम पावसाच्या प्रयोगाचे तीन टप्पे असतात

पहिल्या टप्प्यामध्ये हवेच्या वरच्या थरांमध्ये अशी रसायने फवारतात की जी बाष्पशोषक असतात. मीठाचा बाष्पशोषक गुणधर्म आपल्याला माहिती आहे. पावसाळ्यामध्ये मीठ पाझरते याचा अर्थ हवेतले बाष्प ते शोषून घेते. साधारणपणे कंपन्या ज्या मिठाची विक्री करतात त्यामध्ये ही बाष्पशोषक रसायने काढून टाकलेली असतात. मात्र बाजारात खडेमीठ मिळते त्यामध्ये ही असतात उदाहरणार्थ कॅल्शियम क्लोराईड.

दुसऱ्या टप्प्यामध्ये या बाष्पशोषक कणांनी केलेलं बाष्प आणखी मोठ्या प्रमाणात एकत्र व्हावे म्हणून दुसरी फवारणी केली जाते. त्यामध्ये मीठ, युरिया, अमोनियम क्लोराईड, अमोनियम नायट्रेट, सुका बर्फ असे पदार्थ वापरले जातात. आपण घरी आईसक्रीम करताना बर्फ आणखी गार करण्यासाठी हे पदार्थ वापरले असतील.

पहिल्या दोन घडामोडी झाल्यानंतर ढग दिसायला लागतात.

त्यानंतर तिसरा टप्पा म्हणजे सिल्वर आयोडाइड चा वापर करणे. अत्यल्प मात्रेमध्ये त्याचे द्रावण तयार करून ते ढगांच्या वरच्या बाजूला जोर लावून तुषारांच्या स्वरूपात विमानातून फवारतात. सिल्वर आणि आयोडाईड असे दोन आयन यातून बाहेर पडतात. या आयनांवर विद्युत प्रभार असतो पाण्याचे रेणू हेसुद्धा एका बाजूला धन आणि दुसऱ्या बाजूला ऋण विद्युत प्रभार असणारे रेणू असतात. सिल्वर जो धन प्रभारित आहे त्याच्या भोवती पाण्याच्या रेणूंचा ऋण प्रभारित भाग आकर्षित होतो आणि आयोडाइड हा ऋण प्रभारीत असल्यामुळे पाण्याचा धन प्रभारित भाग त्याकडे आकर्षित होतो. आशा प्रकारे हळूहळू हे पाण्याचे सूक्ष्म रेणू एकत्र येत येत पाण्याचे कण तयार होतात आणि हे कण त्याच वेळेला सुका बर्फही पसरल्यामुळे अधिक थंड होऊन बर्फाच्या रूपात जातात. म्हणजे ढगांमध्ये बर्फ असतो पण अतिशय पातळ आणि विरळ थराच्या रुपात. प्रयोगातून फवारलेल्या रसायनांचे माध्यमातून ते थर एकत्र येतात आणि जड होऊन ते जमिनीकडे सरकतात आणि पाण्याच्या थेंबाचा रूपात आल्यावर त्यापासून पाऊस पडतो.

मिसाईल मधून ढग रोपणी

आज-काल विमानातून फवारणी करण्याच्या ऐवजी ज्याप्रमाणे दिवाळीत फटाके उडवून उंच भागात फटाक्याची दारू पसरवली जाते त्याप्रमाणे ढगाच्याही वरच्या पातळीवर जातील अशी मिसाईल उडवून त्यातून ढगांमध्ये कृत्रिम रसायनांचे रोपण केले जाते. मिसाईल मधून ढग रोपणी करणे विमानाचे पेक्षा स्वस्त पडते आणि त्याची यशस्विता देखील ८० टक्के अधिक आहे. मागे बारामती भागांमध्ये अशा एक प्रयोग करण्यात आला की गॅसच्या फुग्यांमध्ये बारीक केलेली मिठाची पूड भरून ते गॅसचे हजारो फुगे एकाच वेळेला आकाशात सोडायचे. फुगे वर गेले हवेचा दाब कमी होत असल्यामुळे त्यांचा आकार वाढेल आणि विशिष्ट उंचीवर गेल्यावर हे फुगे फुटतील त्यावेळेला या फुग्यांमधून मिठाच्या बारीक

कणांची फवारणी आपोआपच आकाशात होईल आणि त्यापासून पाऊस पडेल अशी अपेक्षा होती.

कृत्रिम पाऊस पाडण्याच्या मध्ये यशस्वीतेचे प्रमाण खूप मोठे आहे असे नाही. अर्थात अजूनही त्यात सुधारणा करायला खूपच वाव आहे.

अमेरिकेत जेव्हा पाऊस पाडण्याचे प्रयोग सुरू झाले त्या वेळेला कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी एक टन पावसासाठी १.३ सेंट इतका खर्च येत होता मात्र त्यात सुधारणा होत आता ऑस्ट्रेलिया मधले यशस्वी प्रयोग पाहता एक टन पावसासाठी केवळ ०.३ सेंट इतकाच खर्च येत आहे

भारतामध्ये प्रयोग

भारतामध्ये १९८३ साली असे प्रयोग करायला सुरुवात झाली. प्रथम तामिळनाडूमध्ये हे प्रयोग झाले. २००३ ला कर्नाटक मध्ये आणि २०१८ आंध्र प्रदेशातल्या बारा जिल्ह्यांमध्ये झाले २००९ साली महाराष्ट्रात एका अमेरिकन कंपनीच्या मदतीने पावसाचे पहिले प्रयोग झाले. या वर्षीही याच प्रकारे कृत्रिम पाऊस पाडण्याचे प्रयोग करण्यात आले. यात शंभर टक्के यश मिळत नसले तरी अधिक सखोल अभ्यास करून आणि योग्य ती वेळ साधून कृत्रिम रोपण करून कृत्रिम पाऊस पाडण्याची अधिकाधिक शक्यता चुका दुरुस्त करत करत वाढण्याची शक्यता आहे

केवळ दुष्काळावर उपाय म्हणूनच पाडला जातो असे नाही.

२००८ साली बीजिंग येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धांच्या उद्घाटन समारोहात त्या समारंभावर पाणी पडायला नको म्हणून बीजिंगच्या अलीकडे असा प्रयोग करण्यात आला. बीजिंगचा समारंभ पावसाविना निर्विघ्न पार पडला. आग्नेय आशियात विशेषत: मलेशिया, इंडोनिशियामध्ये मोठे वणवे लागून जेव्हा हवेत मोठ्या प्रमाणात धुराचे प्रदूषण झाले होते त्यावेळेला ही अशाप्रकारे पाऊस पाडण्याचे प्रयत्न करण्यात आले. २०१७ मध्ये दिल्लीमध्येही जेव्हा हवेतील कणांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढून धुळीचे प्रदूषण झाले त्या वेळेला ही कृत्रिम पाऊस पाडण्याचा प्रयोग बाबत विचार केला गेला मात्र प्रत्यक्षात करण्यात आला नाही.

कृत्रिम पाऊस पाडण्याची काही तोटे आहेत का? त्याबद्दलही विचार करावा लागेल

सर्वात पहिली गोष्ट अशी की कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी रसायनांची फवारणी करण्यात येते ती रसायने मानवी आरोग्याला किंवा सजीवांना घातक नाहीत ना? सिल्व्हर आयोडाइड विशेषतः याचे काही घातक परिणाम दिसून येऊ शकतात. त्यातला सिल्वर एक जड धातू आहे. मात्र याबाबत अधिक संशोधन होण्याची गरज आहे

दुसरा प्रकार म्हणजे आपण माणसे कृत्रिम पाऊस पडत असल्यामुळे आपल्याला त्याची पूर्वकल्पना असेल मात्र इतर सजीवांना याची पूर्वकल्पना नसल्यामुळे त्यांच्या जीवनचक्रा मध्ये फरक पडू शकतात. या निसर्ग चक्रामध्ये अनेक प्राण्यांचे अनेक जीवन चक्रे एकमेकात गुंतलेली असतात त्यामुळे एखाद्याच्या जीवन चक्राला धक्का लावला तरी त्यामुळे इतर जीवांच्या अस्तित्वालाही धक्का लागू शकतो.

तिसरा धोका म्हणजे कृत्रिम पाऊस पाडण्याची कौशल्य माणसाचे हाती आल्यावर तो त्याचा वापर करून शत्रु राष्ट्रावर आघात करण्यासाठी करेल, तसेच दहशतवादीही त्याचा वापर आपली दहशत निर्माण करण्यासाठी करू शकतात.

सुदृढ निसर्ग बिघडला तर

माणसाने आपल्या बुद्धीच्या आधारावर प्रयोग करून विज्ञान तंत्रज्ञान विकसित केले पण ते विज्ञान तंत्रज्ञान कोणत्या कारणांसाठी वापरायचे हे सांस्कृतिक आणि नैतिक बाजू विचारात घेतली नाही तर आपल्या हाती निसर्ग बदलण्याची शक्ती आल्यामुळे आपण कसाही निसर्ग बदल करू शकतो अश्या घमेंडीत माणूस राहिला तर त्यामुळे इथला सुदृढ निसर्ग बिघडला तर माणसावरही त्याचे दुष्परिणाम होणारच. तेव्हा या गोष्टी सावधपणे केल्या पहिजेत.

vinay.ramaraghunathgmail.com



**गुलाब बिसेन**
पन्हाळा जि.कोल्हापूर
९४०४२३५१९१

# अशैक्षणिक कामांचे ओझे...

चालू दशकाच्या सुरूवातीला तंत्रस्नेही या गोंडस शब्दाने महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात बाळसं धरलं. आणि अल्पावधितच या शब्दाला एक वलय निर्माण झाले. महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी या संकल्पनेला खतपाणी घातलं. त्याचसोबत महाराष्ट्रातील शिक्षण साखळीत सर्वात शेवटचा दुवा असलेल्या शिक्षक या घटकाने तो उचलून धरला. तंत्रस्नेही या शब्दाचा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात चांद्यापासून बांद्यापर्यंत बोलबाला झाला. काही शिक्षकांनी तर या क्षेत्राला वाहून घेतलं. त्यावर झपाटल्यासारखे काम करून डोंगदऱ्यापासून दुर्गम वाड्यावस्त्यांवरील शाळांमध्ये तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अध्यापनाची पहाट उगवली. यामुळे विद्यार्थी अधिक क्रियाशील होवून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अभ्यासातील जटिल समस्या सहजरीत्या सोडवू लागले. ज्या गोष्टी तासनतास घोकंपट्टी करूनही पचनी पडत नव्हत्या , त्या संकल्पना चुटकीसरशी समजू लागल्या. शिक्षकांच्या अध्यापनातील कष्टांची बचत झाली.



साभार: आंतरजाल

तरूणांपासून ते पन्नाशी गाठलेल्या अशा सर्वच शिक्षकांनी ही तंत्रस्नेही संकल्पना उचलून धरली. मग त्यासाठी लागणाऱ्या डिजिटल विद्युत उपकरणांची जुळवाजुळवही पदरमोड करून त्यांनी केली. गावात फिरून लोकवर्गणी गोळा केली. संगणक , प्रोजेक्टर , टीव्ही अशा साधनांची जुळवाजुळव केली. काळाची गरज ओळखून अनेक शिक्षकांनी शैक्षणिक ॲप्स , शैक्षणिक व्हिडीओ , यूट्युब चॅनेल , वेबसाईट , ब्लॉग इत्यादींची निर्मिती केली. सॉफ्टवेअरपासून हार्डवेअरपर्यंत (ते आपले क्षेत्र नसतानाही ) काम करून विद्यार्थ्यांच्या भावनिक , बौद्धिक , शारीरिक आणि सामाजिक विकासासाठी काम केले. याचे उदाहरणच द्यायचे झाले तर अख्या महाराष्ट्रात गाजलेली ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील पष्टेपाडा शाळा. संदिप गुंड या हरहुन्नरी तंत्रस्नेही शिक्षकाने अत्याधुनिक डिजीटल साधनांच्या कल्पक वापरातून दुर्गम भागातील शाळेत अत्याधुनिक शिक्षण पोहचवले. याची दखल आपल्या राज्यासोबतच शेजारच्या गुजरात राज्यानेही घेतली. माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनीही या तंत्रस्नेही उपक्रमाचे कौतुक केले. महाराष्ट्रभर तंत्रस्नेही शिक्षकांच्या कार्यशाळा घेत संदिप गुंड यांनी इतर शिक्षकांना प्रेरित केले. त्यांच्याकडुन प्रेरणा घेत महाराष्ट्रातील हजारो शिक्षकांनी वाड्या वस्त्यांवरील शाळा डिजीटल तंत्रज्ञानाने सुसज्ज केल्या.

सोलापूर जिल्ह्यातील रणजितसिंह डिसले या शिक्षकाने सोशल मीडियाचा अध्यापनात प्रभावी वापर करत स्काईपच्या माध्यमातून जगभरातील शाळांतील विद्यार्थी शिक्षकांचा आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधत अध्ययन अध्यापन प्रभावी पद्धतीने करत आहेत. डिसले यांनी बालभारतीच्या पुस्तकांमध्ये क्यूआर कोडची संकल्पना आणून पुस्तकांना इंटरनेटशी जोडून पुस्तकं सजीव करण्याचं काम केलं. त्यांचं अनुकरण आज इतर राज्ये करत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल गुगलनेही घेत त्यांना सन्मानित केले आहे. यांच्यासारखे राज्यभर हजारो शिक्षक तंत्रज्ञानाचा अध्यापनात प्रभावी वापर करून पुरोगामी महाराष्ट्राला शिक्षण क्षेत्रात आघाडीवर नेण्यात खारीचा महत्वाचा वाटा उचलत आहेत. महाराष्ट्रातील शिक्षकांचा तंत्रस्नेही प्रयोगाची भुरळ इतर राज्यांनाही लागली असून त्यांनी या क्रांतीचा अभ्यास करून त्यांच्या राज्यातही राबवण्याचा प्रयत्न केला.

तंत्रस्नेही शिक्षकांनी स्वयंप्रेरणेने नव तंत्रज्ञानाच्या

माध्यमातून शाळांचा कायापालट करण्याचा विडा उचलून तो पूर्णत्वास नेला आणि आजही प्रयत्न करत आहेत. परंतु अलिकडे काही वर्षांत प्रशासनातील काही शुक्राचार्यांनी या तंत्रस्नेही चळवळीतील शिक्षकांचा कारकून करून टाकला आहे. या शुक्राचार्यांनी कारकून शिक्षक नावाचे नवीनच पद निर्माण केले असून प्रशासनाकडे मनुष्यबळ असताना आणि शिक्षक हा अध्यापन व्यतिरीक्त काम करण्यासाठी नसतानाही अशा शिक्षकांकडून प्रशासनाची ऑनलाईन आणि ऑफलाईनही कामे पंचायत समितीपासून ते जिल्हा परिषदेपर्यंत करवून घेतली जात आहेत. देशाची भावी पिढी घडवण्याचे काम निष्ठेने करणाऱ्या शिक्षकांची आजची स्थिती अत्यंत दयनीय झालेली आहे. महाराष्ट्राच्या कुठल्याही भागात आपण गेलो तर यापेक्षा वेगळे चित्र दृष्टीस पडणार नाही.

प्रशासनातील काही शुक्राचार्यांना तंत्रज्ञानाचा वापर करण्यात तरबेज झालेले शिक्षक म्हणजे सोन्याची अंडी देणारी कोंबडी वाटू लागली की काय अशी शंका निर्माण होते. कारण अशा शिक्षकांकडून काम करवून घेताना प्रशासनाला वेगळा खर्च करावा लागत नाही. विद्यार्थी घडवणाऱ्या गुरूजनांना शिक्षकांचे वेतन करणाऱ्या शालार्थ प्रणालीला जुंपण्यात आले. एक टप्पा यशस्वी होताच मग अशी असंख्य शाळाबाह्य कामे या शिक्षकांच्या गळ्यात बांधण्यात आली. शालार्थ पाठोपाठ सरल प्रणाली , शालेय पोषण आहार रोजचा खर्च ऑनलाईन नोंदवणे , शाळांची कामे तात्काळ व्हाट्सअॅपवर मागवणे , मुलांचे नवोदय परीक्षेचे फॉर्म , शिष्यवृत्ती परीक्षेचे फॉर्म भरणे , गणवेश माहिती अशा शेकडो ऑनलाईन कामांना शिक्षकांना गरजेनुसार जुंपण्यात आले आहे.

जिल्हा परीषदेच्या शाळा ह्या ग्रामीण भागात डोंगर दरीत , वाड्यावस्त्यांवर ज्ञानगंगा पोहचवण्याचं काम करतात. त्यामुळे या शाळांना समृद्ध करून शिक्षकांना अध्यापन करण्यास पूर्ण वेळ उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. पण असे घडताना दिसत नाही. याउलट रोज नवे काम लावून त्यांना अध्यापनापासून दूर लोटले जात आहे. त्याचा सरळ परिणाम मुलांच्या गुणवत्तेवर होत आहे. शिक्षकांना शाळाबाह्य कामात अडकवायचे आणि नंतर गुणवत्तेवर बोट ठेवायचे असा दुहेरी डाव सध्या घडीला राज्यातील शिक्षण विभाग शिक्षकांशी खेळत आहे. जिल्हापरिषदेच्या शाळेत शिपाई आणि कारकून उपलब्ध नसल्याने शिक्षकांनाच शिपायापासून कारकुना पर्यंतची सर्व कामे शिक्षकांनाच करावी लागतात. त्यासोबतच अनेक शाळांमध्ये मुख्याध्यापक उपलब्ध नसल्याने मुख्याध्यापकाचा भारही शिक्षकालाच सांभाळावा लागतो. शालेय पोषण आहार योजना तर शिक्षकांच्या मुळावरच उठली आहे. या योजनेसाठी धान्यपुरवठा करण्यासाठी फेडरेशनची नियुक्ती केली आहे. परंतु धान्य वितरणातील अनियमिततेचा फटका शिक्षकांना बसतो. एकिकडे धान्य वितरणातील अनियमितता तर दुसरीकडे मुलांना शालेय पोषण आहारापासून वंचित न ठेवण्याचा नियम अशा कात्रीत शिक्षक पिचला जात आहे.

शिक्षकांना प्रतिनियुक्ती न देण्याचा शासनाचा आदेश असताना राज्यात तोंडी आदेशाद्वारे हजारो शिक्षकांना शाळाबाह्य कामांत राबवून घेतले जात आहे. शिक्षकांना ज्या कामासाठी तंत्रस्नेही करण्यात आले , ते कारण बाजुला सारून प्रशासनाने आपल्या सोईनुसार ऑनलाईन कामांना जुंपून शिक्षणाचा खेळखंडोबा करून टाकला. शिक्षकांवर ऑनलाईन कामांची प्रशासनाकडुन सक्ती केली जाते. परंतु बहुसंख्य ठिकाणी , वाड्यावस्त्यांवर इंटरनेट सेवा नसल्याने शिक्षकांना दुरवरच्या इंटरनेट कॅफेचा आसरा घ्यावा लागतो. यामुळे शिक्षकांचा वेळ शाळाबाह्य कामात जात असल्याचे प्रशासनाला काही देणे घेणे नाही. अशा आविर्भावात रोज नवी कामे लावली जातात. ऑनलाईन काम करताना शिक्षकांना यासाठी पदरमोड करून खर्च भागवावा लागतो. यासाठी शिक्षकांना कुठल्याही प्रकारची आर्थिक तरतुद केली जात नाही. मुलभूत सुविधा उपलब्ध न करता नुसती कामांची अपेक्षा करणे कितपत योग्य आहे याचा विचार प्रशासनातील जाणकारांनी करावे. अशात कुंपणच शेत खात असेल तर दाद कुणाला मागायची ? अशी या शिक्षकांची अवस्था झालेली आहे.



**चंद्रकांत बापू नेरकर**
जि.प.शाळा मोरदडगांव ता.जि.धुळे
९४२३४०७२४८

# हेळसांड शारीरिक शिक्षणाची...

सध्या देशभरात शालेय स्तरावर खेंळाना प्रोत्साहन देशाचा प्रयत्न केला जात असतांना, प्रत्यक्षात मात्र शारीरिक शिक्षण आणि ते देणाऱ्या शिक्षंकाकडे दुर्लक्ष केले जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुलांना संगणक किंवा मोबाईलवरील खेळ न खेळता मैदानात घाम गाळा, असा संदेश दिला. दुसरीकडे दीपा कर्माकर, हरमनप्रीत कौर या शालेय स्तरावर खेळ सक्तीचे हवेत अशी मागणी एका उपक्रमा अंतर्गत करतात. या दोन्ही गोष्टी शालेय स्तरावर खेळ, व्यायाम, शारीरिक शिक्षण यांना प्रोत्साहन देण्यासाठीच आहे. असे म्हटले तरी वास्तव मात्र बऱ्याच वेळा वेगळेच दिसते करतो. पदके जिंकल्यावर त्यांच्यावर बक्षीसांचा वर्षाव करतो. पण कोणत्या गोष्टी त्यांना देतो? ना आपल्याकडे मुलांना खेळण्यासाठी मैदाने असतात, ना तो शिकविणारे शिक्षक ! असेल तर ते एवढ्या मुलांना नियंत्रीत करण्यासाठी पुरेसे ठरत नाही. तरीही अनेक शिक्षक हे आपल्या परिने मुलांना शारीरिक शिक्षणाचे, खेळाचे धडे देतात. मात्र हे प्रयत्न अपुरे आहेत.

महाराष्ट्राचा विचार करायचा झाल्यास मध्यंतरी शारीरिक शिक्षण आणि कला यांच्या तासिका कमी केल्या-वरून महाराष्ट्राभर आंदोलन उभे राहिले. चार तासिका ऐवजी त्या दोनवर आणण्यांचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. पण राज्याच्या 'फुटबॉल वन मिलियन' या उपक्रमावर या शिक्षकांनी बहिष्कार घातल्यांनतर क्रीडामंत्र्यानी चर्चेची तयारी दाखवत. त्या तासिकांची संख्या पुर्ववत करण्याचे आश्वासन दिले आहे. मूळ मुद्दा आहे तो या तासिका कमी करताना एका बाजुला जर पंतप्रधानांपासून सगळे 'खेळाचे महत्त्व' या विषयावर बोलत असतील. आणि गेल्या काही वर्षात भारतात खेळांची स्थिती सुधारली असेल. खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर मानसन्मान मिळत असतील, तर शालेय स्तरावरील खेळाचा, मुलांच्या आरोग्याचा, त्याच्यां आहारचा त्यांच्या व्यायामचा मुद्दा आपण गंभीर माननार आहोत की नाही? शारीरिक शिक्षणाच्या तासिका कमी करणे म्हणजे मुलांच्या व्यायाम शारीरिक व मानसिक वाढीला एकप्रकारे दुय्यम स्थान देण्यासारखेच आहे.

आज मुलांचा कल बहुतांशी टीव्ही, संगणक, मोबाईल याकडे वळताना दिसतो. घरी बसून हे सगळे करण्यापेक्षा मैदानात मुले खेळली तर त्यांची शारीरिक, मानसिक वाढ, उत्तम होईल हे सांगण्यासाठी कुणा तज्ञाची गरज नाही.

तरीही आपण या मुद्दयांकडे गंभीरपणे पाहत नाही. जागतिक स्तरावर असे अनेक अहवाल आलेले आहेत. ज्यात मुलांमधील लठ्ठपणा, स्थुलपणा, मधुमेह यांचे प्रमाण वाढत चालल्याचे सांगितले जाते. मग त्यावर उपाय हा केवळ आहार बदलणे हा नसुन त्याला शारीरिक व मानसिक व्यायामाची जोड देणे हा देखील आहे. किंबहुना शारीरिक शिक्षणाला महत्त्व दिले गेले तर आपोआपच आहाराच्या सवयी बदलू शकतील. शिवाय या विषयाला महत्तव दिले तर शाळा-शाळामधींल उपहारकेंद्रेही मुलांना आरोग्याला पोषक असे पदार्थ विकतील. अशी सुदृढ पिढीच पुढे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शारीरिक खेळात देशाचे नाव उज्वल करू शकेल. म्हणूनच शारीरिक शिक्षणाला, क्रीडा शिक्षणाला महत्त्व देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आपल्याला शारीरिक शिक्षक आणि क्रीडा शिक्षक अशा दोहोंचीही गरज भासेल. पण शारीरिक शिक्षणाच्या तासिका कमी करून अशा शिक्षकांची कोंडी करून आपण आपल्या पिढीवर अन्याय करत आहोत. याचे असले पाहिजे. शारीरिक शिक्षणाबाबत केवळ सरकारला लक्ष्य करण्याचा उद्देश नाही. पण अनेक शाळाही याबाबतीत पिछाडीवर असल्याचे दिसते. अनुदानित किंवा पालिकेच्या शाळांमध्ये शारीरिक शिक्षण या विषयाला महत्त्व आहे तसे ते विना अनुदानित किंवा खाजगी शाळात आहेत का? हे पाहायला हवे या संदर्भात शारीरिक शिक्षण अभ्यास क्रमांतील पुस्तंकाचे लिखाण करणारे रणजीत दळवी यांच्या मुले शाळांकडुन या शिक्षणाला किती प्रोत्साहन दिले जाते की खो घातला जातो हे पाहायला हवे. मुलांचे आरोग्य, त्यांचा आहार, त्यांनी करावयाचे व्यायाम याबद्दल शाळाच जर सजग नसतील तर मुलांना या गोष्टींचा

लाभ होणार कसा?

शारीरिक दृष्ट्या तर मुले तंदुरूस्त होवु शकतील. हा विचार करायला हजर त्यासाठी शाळांत होणाऱ्या कवायती लेझीम याचे खुप मोठे योगदान आहे. विशेषत लेझीमसारखा खेळ तर शरीरला सर्वागीण व्यायाम देणारा आहे. शाळांमध्येही बऱ्याचवेळा खेळ व व्यायाम यांना फारसे महत्त्व न देता बाकी विषयावर अधिकचा भर दिला जातो. त्यामुळे शाळेतील मैदाने, सभागृह यांचा लग्नसोहळे व इतर समारंभासाठी उपयोग होताना दिसतो. हे चित्र बदलणे आवश्यक आहे. राज्याच्या क्रीडा शिक्षक महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र कोतकर म्हणतात की, शारीरिक शिक्षण आणि आरोग्य यावर भर देणे हे शारीरिक शिक्षकांचे काम असल्याचे त्यांच्या तासिकाच कमी केल्यामुळे त्या कामाला कुठेतरी बंधने येत होती पण आता सरकाराने त्या तासिका पुर्वी प्रमाणेच ठेवण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे त्यात पुढे काय होते हे पाहावे लागेल.

शारीरिक शिक्षक डॉ. जितेंद्र लिंबकर यांच्या मते, शारीरिक शिक्षकांची संख्या हा देखील महत्त्वाचा मुद्दा आहे. अनुदानित शाळांत किंवा पालिकेच्या शाळात सरप्लस संख्या असल्यामुळे नव्या क्रीडा शिक्षक किंवा शारीरिक शिक्षंकाची भरती होत नाही. त्यामुळे काही शाळात २००० विद्यार्थी संख्ये-मागे केवळ एक शारीरिक शिक्षक अशी अवस्था पाहायला  मिळते. शासनाच्या धोरणाप्रमाणे २५० विद्यार्थ्यांमागे एक शारीरिक शिक्षक असला पाहिजे. पण ते धोरण कामी आले नाही उलट परिस्थिती आणखी बिकट आहे. शाळाशाळांमध्ये जर शारीरिक शिक्षणासाठी असे शिक्षक असतील तर सोबत स्वतंत्र क्रिडाशिक्षक तर मुलांना खेळाचे ज्ञान अधिक व्यापक बनेल. तो बोजा शारीरिक शिक्षकांवर येणार नाही शाळेतील मुलांच्या वाढीमुळे, त्यांच्या तंदुरूस्तीकडे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक संतुलनाकडे शारीरिक शिक्षकांच्या माध्यमातुन लक्ष ठेवता येईल. आणि ही काळजी गरज आहे. सुदृढ पिढी तयार करण्याचा मार्ग ही शारीरिक शिक्षणातूनच जातो हे लक्षात घेतले पाहिजे.

## शिक्षणवार्ता...

# शाळा प्रवेशासाठी आता १५ दिवसांची शिथिलता

शासनाने शाळा प्रवेशासाठी बालकांचे किमान वय निश्चित केले होते. प्ले-ग्रुप/नर्सरीमध्ये प्रवेशासा ज्या बालकांचे ३० सप्टेंबरपर्यंत वय ३ व पहिल्या वर्गाच्या प्रवेशासाठी ६ वर्ष होत असेल त्यांनाच प्रवेश देण्यात येत होता. त्यामुळे १ ते २ दिवस कमी असलेल्या विद्यार्थ्यांना शाळेमध्ये प्रवेश मिळत नव्हता. त्यांचे वर्ष वाया जात होते.

यासंदर्भात शासनाकडे तक्रारी व निवेदनही प्राप्त झाले होते. याची दखल घेत शासनाने शाळा प्रवेशासाठी वयाची अट शिथिल केली आहे. यात १५ दिवसांची शिथिलता दिली आहे.

शिक्षण हक्क कायद्यानुसार बालकांना प्रवेश घेण्यासाठी १ दिवसही कमी असेल तर प्रवेश दिला जात नव्हता. त्यामुळे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहत होते. यासंदर्भात आरटीई ॲक्शन कमिटीने शासनाला निवेदन देऊन, यात शिथिलता आणण्याची मागणी केली होती. राज्यभरातून अशी निवेदने व तक्रारी शासनाकडे दरवर्षी प्राप्त होत होत्या. त्याची दखल घेऊन शासनाने वयोमर्यादेत १५ दिवसांची सुट दिली आहे.

यासंदर्भात शासनाने २५ जुलैला शासन निर्णय काढला आहे. प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी शासन आदेशानुसार पत्र काढून सर्व व्यवस्थापनाच्या शाळेंच्या मुख्याध्यापकांना पत्र पाठविले आहे. शिक्षणाधिकाऱ्यांनी काढलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे की, ज्या बालकांचे वय ३० सप्टेंबर २०२० रोजी ६ वर्ष असेल किंवा ६ वर्ष पूर्ण होण्यास १५ दिवस बाकी असेल, अशा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा. पण १५ दिवसांपेक्षा जास्त दिवस होत असेल तर, त्यांन नियमानुसार प्रवेश देता येणार नाही.



**सौ.सारीका निशांत रंधे**
सौ.सावित्रीताई व्यंकटराव रंधे गर्ल्स हाय. शिरपूर जि.धुळे
९८५०२४७१२२

# मैदान गाजविणाऱ्या सावित्रीच्या लेकी




२१व्या शतकात Space Is The Limit म्हणत महिलांनी यशाची शिखरे सर केलीत.हा आजवर थक्क करणारा प्रवास विद्यादात्री सावित्रीआई फुलेंच्या एका पुरोगामीत्वाने सुरू झाला.

''जो सफर की शुरवात करते है
वो मंजिल को पाकर रहते है
बस एक बार चलेन का हौसला हो
तो रास्ते भी अछे राहगीरोका
इतजार करते है''

शिक्षणक्रांतीने स्त्रीयांना सृजनत्वाची नवी दालने खुली करून दिली.त्यात आजवर महिलांनी सांघिक क्षेत्रातदेखील नवनवीन विक्रम प्रस्थापित केले आणि त्यांनी मैदान गाजवले व भारतमातेच्या शिरपेचात सुवर्णतुरा रोवला आहे.अशा मैदान गाजवणाऱ्या प्रेरणादायी खेळाडुंमुळे '' खेलोगे कुदोंगे तो बनोगे नवाब'' असा सकारात्मक भाव निर्माण झाला आहे.

**१)मेरी कोम :** बॉक्सींग मध्ये देशाला ऑलिम्पिक व विश्वविजेती म्हणून सतत ६ वर्षे सुवर्ण देणारी मेरी कोम ३६ वर्षीय ही महान खेळाडू होय.तिचा जन्म मणिपुर येथे झाला.तिला पद्मभूषण ,राजीव गांधी खेलरत्न ,अर्जुन पुरस्कार प्राप्त झाले आहेत.तिच्या जीवनावर मेरी कोम हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे.

**२) पी.व्ही.सिंधू :** बॅडमिंटन खेळात आलिंपीकमध्ये भारतास प्रथमच पदक २५वर्षीय (कांस्य)मिळवून देणारी महिला रेकॉर्ड तिच्या नावावर आहे.हैद्राबाद येथे तिचा जन्म झाला असून पद्मश्री,राजीव गांधी खेलरत्न ,पद्मभूषण हे पुरस्कार प्राप्त केले आहेत.

**३)सायना नेहवाल :** भारताची फुलराणी म्हणून ओळखली जाणारी२९ वर्षीय हिस्सार येथील उत्कृष्ट बॅडमिंटन प्लेयर आहे.आलिंपीक मध्ये उपांत्यफेरी गाठणारी पहिली महिला,व ज्युनियर बॅडमिंटन स्पर्धा जिंकण्याच बहुमान असून पद्मश्री,पद्मभूषण , पुरस्कार मिळाले आहेत.

**४) सानिया मिर्झा :** ग्रॅडस्लॅम खेळणं हे प्रत्येक बॅडमिंटन खेळाडूचे स्वप्न असते.२३ वर्षीय सायना ने ३ग्रॅडस्लॅम व मिश्र दुहेरी ची ४ अजिक्यपदांची मानकरी ठरली.

**५) मिताली राज :** सर्व क्रिकेट प्रेमींच्या मनावर राज्य करणारी मिताली राज ही ३६ वर्षीय भारताची कॅप्टन फंलदाजीत लोकप्रिय कारकिर्द करणारी सर्वोत्तम खेळाडू होय.

**६) दिपा मलिक :** पॅराऑलींपीक मध्ये गोळा फेक प्रकारात दिव्य कामगिरी करुन सूवर्ण पदकाची कमाई करणारी ४९वर्षीय दिपा मलिक पहिली महिला होय.अर्जून ॲथलेटीक्स अवार्ड ,पद्मश्री पुरस्कार तीने प्राप्त केले आहेत.

**७)हिमा दास :** अनस्टॅापेबल, भारताची सुवर्णकन्या असा जिचा ऊल्लेख केला जातो ती १९वर्षीय हिमा दासने २०१८ -१९ मध्ये आशियायी,IF,B स्पर्धांमध्ये २००मी व ४०० ॲथलेटीक्स ला ६ सुवर्णपदकाची कमाई करणारी प्रथम महिला खेळाडू होय.कमी वयात ऊत्तुंग कामगिरी करणाऱ्या हिमाकडुन ऑलींपीकसाठी आकांक्षा ऊंचावल्या आहेत.तिला अर्जून पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

**८) साक्षी मलिक :** मल्ल प्रकारात भारताला ालींपीक मध्ये कांस्य पदक प्राप्त केले.२७ वर्षीय साक्षी मलीकने ५८किलो वजनी गटात महत्त्वपूर्ण कामगिरी केली.

**९) दिपा कर्मारकर :** ऑलिंपीक २०१६ मध्ये

ॲथलेटिक्स मध्ये कांस्य पदक प्राप्त करणारी प्रथम महिला खेळाडू होय.राजीव गांधी खेलरत्न व पद्मश्री ॲवार्ड तिला दिले आहेत.

**१०)अरूणिमा सिन्हा :** खिलाडूवृत्तीची सर्वोच्च मूर्तीमंत उदाहरण म्हणजे एव्हरेस्ट वीरांगणा अरूणिमा सिन्हा हे अद्वितीय उदाहरण सर्वासमोर आहे.हॉलीबॉलची राष्ट्रीय खेळाडू ते प्रथम दिव्यांग एव्हरेस्टवीर असा प्रेरणादायी प्रवास अंतर्मूख करायला लावतो.तसेच राही सरनोबत,मनू भाकर (शूटींग ) सुवर्ण पदकाची कमाई केली आहे.करनाम मल्लेश्वरी (वेटलीफटींग)सुवर्ण मिळवणारी भारताची खीपश्रवू ओळखली जाते.राणी रामपाल हा हॉकी संघाची कर्णधार आहे.

विविध खेळांत चमकदार कामगिरी करताना जिद्द ,चिकाटीची पराकाष्ठा आणि कस लागुन ही वेलू गगनावर जात आहे.अलिकडच्या काळात जागतिक स्तरावर महिला खेळाडूंची संख्येत भर पडत आहेत.भारतीय महिला खेळाडू ह्या फक्त देशासाठीच खेळतात व पदकांची भर घालतात.प्रतिकुल परिस्थिती वर मात करून  खेळासाठी जगतात.

(उर्वरीत पान क्रं.२४वरून)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २५ | राजे उमाजी नाईक जयंती | ७ सप्टेंबर,२०२० | सोमवार | १६भाद्रपद,शके१९४२ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण |
| २६ | पं.दिनदयाळ उपाध्याय जयंती | २५ सप्टेंबर,२०२० | शुक्रवार | ०३अश्विन,शके१९४२ | – |
| २७ | महात्मा गांधी जयंती | २ऑक्टोंबर,२०२० | शुक्रवार | १०अश्विन,शके१९४२ | – |
| २८ | लाल बहादूर शास्त्री जयंती | २ऑक्टोबर,२०२० | शुक्रवार | १०अश्विन,शके१९४२ | – |
| २९ | डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती | १५ऑक्टोबर,२०२० | गुरूवार | २३अश्विन,शके१९४२ | – |
| ३० | महर्षि वाल्मिकी जयंती (तिथी) | ३१ऑक्टोबर,२०२० | शनिवार | ९कार्तिक,शके१९४२ | – |
| ३१ | इंदिरा गांधी पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिवस | ३१ऑक्टोबर,२०२० | शनिवार | ९कार्तिक,शके१९४२ | – |
| ३२ | वल्लभभाई पटेल जयंती राष्ट्रीय एकता दिवस | ३१ऑक्टोबर२०२० | शनिवार | ९कार्तिक,शके१९४२ | राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेणे |
| ३३ | पंडीत नेहरू जयंती | १४नोव्हेंबर,२०२० | शनिवार | २३कार्तिक,शके१९४२ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण |
| ३४ | बिरसा मुंडा जयंती | १५नोव्हेंबर,२०२० | रविवार | २४कार्तिक,शके१९४२ | – |
| ३५ | इंदिरा गांधी जयंती व राष्ट्रीय प्रतिमेस पुष्पहारअर्पण करणे एकात्मता दिन | १९ नोव्हेंबर,२०२० | गुरूवार | २८कार्तिक,शके१९४२ | एकात्मता दिवसाची शपथ |
| ३६ | संविधान दिवस | २६नोव्हेंबर,२०२० | गुरूवार | ५मार्गशीर्ष,शके१९४२ | भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन |
| ३७ | संत जगनाडे महाराज जयंती | ८ डिसेंबर,२०२० | मंगळवार | १७मार्गशिर्ष,शके१९४२ | प्रतिमेसपुष्पहार |



**मनोहर मोहरे**
मु.पो.फुलवडे, ता.आंबेगांव जि.पुणे
८६६९१५८२७६/७९६३६१९६५०
Email-mahohar511976@gmail.com

# मदत...

यावर्षी जोरदार अतिवृष्टी झाल्याने मोरगावातील नदीला महापूर आला होता. मोरगाव पाण्यात बुडायला लागल्याने घरदार सोडून माणसे कशीबशी अंगावरील कपड्यानिशी सुरक्षित ठिकाणी गेली होती. अनेकांच्या घराच्या भिंती कोसळल्या छप्परं. जमीनदोस्त झाली. धनधान्य,कपडे,वस्तु भिजल्या. अनेकांचे संसार वाहून गेली. अनेकांचा अंगावरील कपड्यानिशी जीव तेवढा वाचला होता.

खालच्या आळीत राहणारे महादबा आणि गंगुबाई यांचे घर पुर्ण जमिनदोस्त झाले होते. त्याचा मुलगा शुभम हा चौथीत शिकत होता. त्याचे दप्तर, वह्या,कपडे,पुस्तके भिजुन त्याचा लगदा झाला होता. पुर ओसरल्यानंतर आईवडिलांसोबत जेव्हा तो घराकडे आला तेव्हा आपल्या साहित्याची झालेली अवस्था पाहून त्याच्या डोळ्यात पाणी आले. तो हिरमुसला. आता माझी शाळा बुडणार! मी शाळेत काय नेऊ ? एक ना अनेक प्रश्न त्यांच्या मनात कालवा कालव करत होते. तो पुरता गोंधळुन गेला होता. भिजलेली पुस्तके, वह्या हातात घेऊन मुसमुसुन रडत होता.

शुभमचे आई मोलमजुरी करुन उपजिविका करायचे घर जमिनदोस्त झाल्याने रहायचे कुठे? खायचे काय? या चिंतेत ते दोघे याचना करत होते. मात्र सरकारने पुरग्रस्तांची व्यवस्था एका मंदीरात केलयाने एक-दोन दिवसांची चिंता मिटली होती.त्यांची ही कहाणी एक दिवशी वृत्तपत्रात छापून आली होती. परिपाठात बातमीवाचन करताना पारगावच्या शाळेतील सार्थकने ही बातमी मोठ्याने वाचली. सर्वांनी लक्षपूर्वक ऐकले आणि प्रत्येकालाच शुभमविषयी हळहळ वाटू लागली. मुले आपसात कुजबुज करु लागली.

गुरुजींनी मुलांना विचारले, तुमच्या पैकी शुभमला कोण कोण मदत करणार? गौरी म्हणाली सर माझ्याजवळ दोन वह्या जास्त आहेत त्या मी उद्याच आणून देते. तन्मय म्हणाला, माझ्याजवळ पेन आहे. राहुल म्हणाला, माझ्याकडे पेन्सील आणि खोडरबर आहे. राधिका म्हणाली माझ्याकडे दोन दप्तर आहेत. मी एक दप्तर शुभमला देईन. ईशान म्हणाला सर माझ्याजवळ कपडे आहेत ते ते मी देतो. शाळेतील प्रत्येकजन काही ना काही देण्यास राजी झाला होता.शाळा सुटल्यानंतर घरी गेल्यावर मुलांनी ही बातमी आपल्या आईवडिलांना सांगितली. तेव्हा सर्व पालकांनी एकत्र जमून विचार विनिमय केला. आणि प्रत्येक घरोघरी जाऊन शुभमला मदत गोळा करण्याचे ठरवले. मिळेल तेवढे धान्य, कपडे, पैसे मुलांसहीत पालकांनी जमा केले. सार्थकने एका वहीत त्यांची नोंद घेतली.आणि दुसऱ्या दिवशी जमा झालेले सर्व साहित्य शाळेत शिक्षकांकडे आणून दिले.

शिक्षकांनी सर्व साहित्य एका सामाजिक संस्थेमार्फत शुभमला पाठवले दुसऱ्याच दिवशी ते साहित्य शुभमला मिळाले ते सर्व साहित्य पाहुन शुभमला खुप आनंद झाल दप्तरात वह्या पुस्तके भरुन तो शाळेत जाण्याची तयारी करु लागला. तेव्हा त्याची आई त्याला म्हणाली अरे शुभम हे साहित्य ज्या छोट्या दोस्तांनी पाठवले आहे त्यांचे पत्र लिहुन आभार तरी मान! हो गं आई साहित्य मिळाल्याच्या आनंदात मी हे विसरलोच होतो. हे बघ लगेच आभाराचे पत्र लिहीतो.शुभने सांगितले.

असे म्हणत पेन आणि वही घेऊन शुभमने एक कागदावर लिहीले. धन्यवाद माझ्या छोट्या दोस्तांनो! संकटकाळी मदत करणे हे सुध्दा चांगले शिक्षण आहे. चांगले संस्कार आहेत तुम्हाला मदतीचे महत्त्व समजले आहे. तुमच्या मदतीमुळेच आता मला धीर मिळाला आहे. माझे शिक्षण सुरु राहणार आहे. मला शिकण्याचे बळ मिळणार आहे. तुम्ही खुप चांगले काम केले आहे. तुम्ही एकदा माझ्या घरी या. महापुराच्या सर्व घडामोडी मी तुम्हाला सांगेन.



संदेश नंदकिशोर हजारे
जि.प.शाळा ता.शिरपूर जि.धुळे
९८५०९६४६०१

# मागे वळून पाहतांना...

**'मद्रास' चे नामांतर' तामिळनाडू'**

१९५६ च्या भांषावार प्रांतरचनेनुसार तामिळबहुल भागाची पुनंर्रचना करून मद्रास राज्य अस्तित्वात आले. त्यांनतर १९५९ साठीं 'आंध्रप्रदेश व मद्रास अधिनियम' हा कायदा करून मद्रास राज्याची पुनंर्रचना करण्यात आली. दरम्यान तमिळी जनतेच्या मागणी नुसार १९६८ मध्ये 'मद्रास राज्य (नामांतर) अधिनियम' कायदा पारित करून १४ जानेवारी १९६९ पासुन'मद्रास' राज्याचे 'तामिळनाडु' असे नामांतर झाले.

**केंद्रशासित'हिमाचल प्रदेश' झाले घटक राज्य**

स्वांतत्र्यप्राप्तींनतर संस्थानांच पुनंर्गठन करतांना सुमारे ३० लहान संस्थानांच एकत्रीकरण करून १५ एप्रिल १९४८ रोजी हिमाचल प्रदेश अस्तित्वात आला. तेव्हा हा भाग प्रांतीय आयुक्तांच्या अखत्यारीत होता. १९५१ मध्ये केंद्रसरकारच्या अखत्यारीत येऊन राज्यपालाची नेमणुक करण्यात आली. १९५६ च्या भांषातार प्रांत रचना झाल्यांनतर हिमाचल प्रदेशास केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा मिळाला. मात्र तेथे विधानसभा न रहाता प्रादेशिक परिषद अस्तित्वात आली. या विरोधात तीव्र आंदोलने झाल्याने १९६६ मध्ये पंजाब पुनर्रचना कायदा संमत होऊन पंजाबमधील पहाडी भागाचा हिमाचल प्रदेशात समविष्ट करण्यात आता. मात्र नंतर जनतेच्या मागण्या लक्षात घेऊन २५ जानेवारी १९७१ रोजी हिमाचल प्रदेश घटक राज्य म्हणुन अस्तित्वात आलं.

**झार्लिना अनुभही कार्यान्वित**

नैसर्गिक युरेनिअम इंधन म्हणुन आणि जड पाणी मॉडरेटर म्हणुन ज्यात वापरलं जात अशा 'झार्लिना' अनुभट्टीची भारतीय शास्त्रज्ञांनी निर्मिती केली. आणि ही अनुभट्टी १४ जानेवारी १९६१ रोजी कार्यान्वित झाली.'झार्लिना' हे नावा झिरो एनर्जी रिॲक्टर फॉर लॅटिस इन्व्हेस्टिगेशन्स ॲड न्यु ॲसेंब्लीज् या नावाचे लघुरूप आहे. या अनुभट्टीमधील वेगवेगळ्या लॅटिस घटकांच्या पॅरामीटर्सचं संशोधन करण्याचा दृष्टीने ही अणुभट्टी उपयुक्त ठरली. पुढे १९८३ मध्ये तिचा वापर करण थांबवण्यात आलं.

**कल्पकम पॉवर स्टेशन कार्यान्वीत**

तामिळनाडू मधील कल्पकम येथे ॲटॉमिक पॉवर स्टेशन युनिट-१ ची उभारणी २७ जानेवारी १९८४ मध्ये सुरू करण्यात आली. या युनिटमध्ये प्रेशराईज्ड हेवी वॉटरचा उपयोग करण्यात आला.त्यानंतर १९८९ मध्ये युनिट ची उभारणी झाली. प्रेशराईज्ड हेवी वॉटर चा उपयोग साध्य करण्यात या निमित्ताने भारतीय वैज्ञानिकांना यश आले होते.

**ताश्कंद करार**

१९६५ रोजी भारत-पाकिस्तान युध्द संपुष्टात येऊन उभयपक्षी युध्दबंदी घोषीत झाली. त्यांनतर दोन्ही देशांच शिष्टमंडळ जोनवारी १९६६ च्या पहिल्या आठवड्यात सोव्हीयत रशियातील ताश्कंद इथे रवाना झालं. ४ जानेवारी १९६६ ते १० जानेवारी १९६६ या काळात ताश्कंद या शहरात सोव्हीयत रशियाचे पंतप्रधान अलेक्झांडर कोसिजीन यांच्या उपस्थितीत शिखर बैठक होऊन उभय देशामध्ये समझोता होऊन करार करण्यात आला.' तोच ताश्कंद करार' म्हणून ओळखला जातो. त्यातील कलमे पुढीलप्रमाणे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदे आधारे दोन्ही देशांनी सलोख्याचे संबध ठेऊन शांततामय मार्गाने काश्मीर प्रश्नावर तोडगा शोधावा . ५ ऑगस्ट १९६५ रोजी दोन्ही देशाच्या फौजा जिथे होत्या त्याच जागेवर पुन्हा जावे.

एकमेकांच्या कारभरात लक्ष न घालणं, राजनैतीक पातळीवर संबध निर्माण करणे, युध्दकैदंयाची त्वरीत अदलाबदल,निर्वासित व बेकायदेशीर स्थालांतरीत प्रश्नावर चर्चा असे महत्त्वाचे मुद्दे या करारात होते.

या करारवर भारताचे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री व पाकिस्थानचे अयुब खान यांनी १० जानेवारी १९६६ रोजी स्वाक्षऱ्या केल्या. आणि त्याच मध्यरात्री लाल बहादूर शास्त्री यांचे ह्दयविकाराच्या तीव्र धक्क्यानं निधन झालं.



**पोपट शिवाजी निकम**
जि.प.शाळा गायकवाड चव्हाण मळा
आरग, ता.मिरज जि.सांगली
८८५७९३१०४८

# माझी शाळा-माझे उपक्रम...

आज आपण जर पाहिलं तर सर्वच क्षेत्रात आपल्याला स्पर्धा असल्याचे दिसुन येते. या स्पर्धेच्या युगात प्रत्येकाला आपली योग्यता, कार्यक्षमता दाखवावीच लागेल. त्याशिवाय या स्पर्धेत आपण टिकू शकणार नाही. आणि हि स्पर्धा सुद्धा आज आपल्याला शिक्षणक्षेत्रामध्ये, वेगवेगळ्या शाळांमध्ये लागल्याचे दिसून येते. मग त्या जिल्हा परिषद शाळा असोत, खाजगी असोत, आश्रमशाळा असोत, सर्वाच्यात स्पर्धा लागल्याचे दिसून येते. आज आपण पाहिलं तर जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा विध्यार्थी गुणवत्ता विकास तसेच भौतिक सुविधांमध्ये अव्वल ठरलेल्या आहेत. आज अनेक जिल्हा परिषद शाळांनी स्वच्छ व सुंदर प्राथमिक शाळा, आदर्श प्राथमिक शाळा तसेच शालेय विविध स्पर्धेमध्ये शाळांनी क्रमांक पुरस्कार पटकावले आहेत. प्रत्येक शिक्षक आस्थेने, श्रद्धा ठेवुन शाळेसाठी प्रामाणिकपणे झटत आहे. प्रत्येकजन आपापल्या शाळेच्या शैक्षणिक उठाव तसेच विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी झटत असल्याचे दिसून येते. आणि यासाठी हे जिल्हा परिषद शिक्षक आपापल्या शाळेत विविध प्रकाराचे शालोपयोगी उपक्रम राबवित आहेत. आणि यातीलच एक भाग म्हणुन आमच्या शाळेत १००% राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची मांदियाळी या ठिकाणी देत आहे.

१) मुक्तांगण वाचनालय २) वर्गमंत्रिमंडळ ३)दुरेघी अनुलेखन ४)चाररेघी अनुलेखन ५) उपचारात्मक अध्यापन वर्ग ६) दत्तक मित्र ७) शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर ८) विविध खेळांचे आयोजन ९) स्वयंअध्ययन १०) कविता सादरीकरण ११) विविध उपक्रमांत विध्यार्थी सहभाग १२) आपला मित्र -फळा १३) पालकांचा निर्मिती १४) अक्षर देऊन प्रत्येक विद्यार्थ्याकडून फळ्यावर शब्दलेखन करवून घेणे. १५) सामुहिक प्रकट वाचन १६) इंग्रजी शब्द वाचन १७)चित्रवाचन- प्रश्नोत्तर सराव १८) पाढे पाठांतर १९) शालेय रंगरंगोटी २०) स्वच्छ-सुंदर शाळा स्पर्धा सहभाग २१)आदर्श शाळा स्पर्धा सहभाग २२) जोडाक्षरयुक्त शब्द-वाचन लेखन २३)शब्द भेंड्या २४)वाढदिवस साजरे करणे २५)बालसभा २६) २७)स्वच्छतेचे पूजक २८)माता-पालक २९)स्मरणयुक्त खेळ (स्पेलिंग- ) ३०) उपस्थिती ध्वज ३१)स्वत: उपस्थिती नोंदविणे ३२)ज्ञानरचनावाढ ३३) ३४)क्षेत्रभेट ३५)तंबाखूमुक्त शाळा ३६)ई-लर्निंग ३७) बोलक्या भिंती ३८) औषधी वनस्पतींची बाग ३९)सामान्यज्ञान वृद्धी ४०) वक्तृत्व स्पर्धा.

मार्गदर्शक,मा. गणेश भांबुरे ( शिक्षण वि.अधिकारी, शशिकांत माने (कें.प्र) यांच्या मार्गदर्शनाखाली आमच्या शाळेत वरील सर्व प्रकाराचे उपक्रम आम्ही प्रकर्षाने राबवित आहोत. यासाठी माझे सहकारी अमोल शिंदे सरांची साथ मिळाली.

आमच्या जिल्हा परिषद शाळेची स्थापना जुलै २००१ रोजी एका वस्तीशाळेच्या रूपाने झाली. सन २००१ ला महाराष्ट्रात ८५६७ वस्तीशाळा स्थापन झाल्या. यामध्ये जिल्हास्तरीय स्वच्छ व सुंदर व आदर्श प्राथमिक शाळा पुरस्कार मिळविणारी राज्यातील पहिली वस्तीशाळा ठरण्याचा मान आमच्या शाळेस प्राप्त झाला. तत्कालीन महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री कै.मा. आर.आर.आबा यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक-ट्रॉफी देऊन शाळेचा करण्यात आला.

शाळेत विविध प्रकाराचे उपक्रम प्रकर्षाने, जाणीवपूर्वक, उद्दिष्ट समोर ठेवून राबविल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये, शाळेच्या प्रगतीमध्ये सकारात्मक नजरेत भरणारे असे बदल दिसून आले. आणि एक प्रकाराचा शाळेचा परिसरात बोलबाला झाला. शाळेचा एक वेगळा ठसा निर्माण झाला. शाळेला महाराष्ट्राच्या विविध भागातून भेटी पडू लागल्या.

शाळेची ख्याती महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पसरली आणि याचे सर्व श्रेय शाळेत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमाला द्यावे लागेल.

वरती नमूद केलेले सर्व उपक्रम आम्ही आमच्या शाळेमध्ये प्रकर्षाने, जाणीवपूर्वक राबविल्यामुळे एकंदरीत शाळेच्या शैक्षणिक उठावमध्ये तसेच विद्यार्थी गुणवत्ता वाढीमध्ये खुपच सकारात्मक बदल झाले. या उपक्रमामुळे खालील फायदे झाल्याचे निदर्शनास आले.



१)जिल्हास्तरीय स्वच्छ व सुंदर पुरस्कार मिळाला. २) जिल्हास्तरीय आदर्श प्राथमिक शाळा पुरस्कार शाळेस मिळाला. ३) विद्यार्थी गुणवत्ता विकास कार्यक्रमात शाळेस पुरस्कार मिळाला. ४) सन २००१ पासून आजतागायत जवळजवळ १२ लाखाचा शैक्षणिक उठाव करण्यात यशस्वी ठरलो. ५) शालेय समाजामध्ये पत वाढण्यास मदत झाली. ६) शालेय वातावरण आनंदी, बालस्नेही, भयमुक्त राहण्यास मदत झाली. ७) विद्यार्थ्याची अभ्यास करण्याचा कल वाढला. ८) विद्यार्थ्याची गुणवत्ता वाढली. ९)गुणवत्ता विकास अंतर्गत शाळेस 'अ' श्रेणी प्राप्त. १०) विविध स्पर्धामध्ये विद्यार्थ्याचा सहभाग वाढला. बक्षिसे मिळू लागली. ११) हस्ताक्षर सुधारणा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुंदर येँऊ लागले. १२) मुळे पालक वर्ग आपोआप शाळेशी जोडला गेला. १३)शब्दभेड्यामुळे विद्यार्थ्याच्या शब्दसंपत्तीमध्ये वाढ झाली. १४) विद्यार्थ्यांच्या वकृत्व स्पर्धेमुळे मुंलाचे भाषण कौशल्य, तसेच विध्यार्थी धाडसी बनले. १५) मुलांचे शाळेत वाढदिवस साजरे केल्यामुळे मुंलाच्यात शाळेबद्दल आत्मीयता,जिव्हाळा वाढला. १६) व या उपक्रमामुळे विद्यार्थी गुणवत्ता विकास मध्ये खुपच समाधानकारक बदल झाला. १७)इतर ठिकाणातुन शाळा पाहणीसाठी वेगवेगळ्या शाळा भेटी देऊ लागल्या. १८)अधिकारी-पदाधिकारी यांच्या शाळा भेटी वाढल्या यांच्या कौतुकाची थाप आपोआप मिळु लागली. १९) अेबीपी माझा वाहिनीवर शाळा झळकती.

एकंदरीत या उपक्रमामुळे शाळेच्या गुणवत्तेबरोबरच शाळेची प्रसिद्धी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचली. आमच्या शाळेचा आदर्श परिसरातील सर्व शाळांना तसेच इतर ठिकाणाच्या शाळेना झाला. समाजाचा जिल्हा परिषद, शाळांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. समाजाला वाटू लागलं की जिल्हा परिषद शाळा हे आपलं दुसर कुटुंबच आहे.



**गोकुळ भगवान थोरात**
आर.सी.पटेल अनु.आश्रमशाळा
निमझरी ता.शिरपूर जि.धुळे
७५८८५१६८४४

# नाविन्यपूर्ण उपक्रम का व कशासाठी ?

नाविन्यपूर्ण उपक्रम का व कशासाठी हा प्रश्न नेहमी मनात असतो. दररोज अध्यापन प्रामाणिक करूनही हा अट्टहास का ?

नाविन्यपूर्ण उपक्रमाचे काही अर्थ आपण खालील प्रमाणे सांगू शकतो. अध्यापनात पारंपारिक पध्दत न वापरता विद्यार्थ्यांना सुलभ रित्या समजेल अशी कृतीयुक्त रचना म्हणजे नवोपक्रम. उत्साहाने नव्याने कार्यप्रेरित होण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे नवोपक्रम. शिक्षकाने सातत्याने स्व-प्रेरणेने विद्यार्थ्यांसाठी मिळविलेले ज्ञान म्हणजे नवोपक्रम. गुणवत्ता वाढवणेसाठी केलेला स्व-प्रयत्न म्हणजे नवोपक्रम. आपले विचार प्रत्यक्ष कृतीतून दाखविण्यासाठी केलेली कृती म्हणजे नवोपक्रम नवोपक्रम म्हणजे कालसापेक्ष नवीनता म्हणजेच कधीही न झालेला नवोपक्रम  नवोपक्रम म्हणजे स्थलसापेक्ष नवीनता म्हणजेच इतरत्र झालेला पण कार्यक्षेत्रात नवीन असा नवोपक्रम नवोपक्रम म्हणजे व्यक्तीसापेक्ष नवीनता म्हणजेच इतर शिक्षकांच्या दृष्टीने  नवीन असा नवोपक्रम वरील वाक्यांचा अर्थ लक्षात घेवून जर आपण नाविन्यपूर्ण उपक्रमाचा विचार केला तर बरेच उपक्रम आपणास सांगता येतील जसे कि, १)चला पाढे शिकू या २) राज्य ,जिल्हे चुंबकीय नकाशा वाचन ३)शीतपेय टोपणापासून विविध भौमितिक आकार ४) शाळेत लहान गट व मोठे वर्ग भरविणे ५) मुलांना अध्ययनात टॅबचा वापर ६) परिसरातील टाकाऊ वस्तू पासून टिकाऊ वस्तू बनविणे ७)संख्याज्ञानासाठी मणी तारा वापर ८)विविध भौमितिक आकृती साठी मॅट आणि बॉल वर्ग व काठिन्य पातळि नुसार बदल करावा . ९)अध्ययन अध्यापनात ABL वापर १०) शाळा अंतरंग व बाह्यांग आकर्षित करणे ११) औषधी वनस्पती ओळख १२)व्यवसायिक शिक्षण कार्यानुभव अंतर्गत युरियाच्या गोणी पासून हँगिंग गार्डन १३)परिपाठात दररोजच्या दिनांकाचा पाढा म्हणणे. १४)दररोज एक इंग्रजी अक्षरावर आधारित शब्द सांगणे. १५)परिपाठा नंतर रोज एका समाजसुधारकांची माहिती १६)वर्तमानपत्रातील शैक्षणिक बातम्याचा संग्रह १८) शारीरिक स्वच्छता.१९) टायर गेम २०) दोन बोटात कागद सरळ रेषेत कागद फाडणे.२१) दगडांपासून ० ते ९ अंक, मराठी मुळाक्षरे, इंग्रजी मुळाक्षरांचे आकार बनवणे.२२) हजेरी घेतांना येस सर ऐवजी वर्गातील वस्तूंची मराठी किंवा इंग्रजीत नावे सांगणे.२३) ओळखा पाहू मी कोण?२४) हाताच्या बोटाने विविध प्रकारच्या डाळी व धान्य निवडणे.२५) चित्रावरून अक्षर,शब्द लेखन करणे.२६) पाठीवर अंक व अक्षरे गिरवणे व ओळखणे२७) सारखे आकार वेगळे करणे .२८) चित्र वाचन२९) चित्रांचे आकार जोडून चित्र पूर्ण करणे.३०) कोलाजकाम करणे. अशा पद्धतीने आपण वरील प्रमाणे नाविन्यपूर्ण उपक्रम आपल्या वर्गात राबवू शकतो.बदलत्या काळानुसार शिक्षणात वेगवेगळ्या पद्धतीनुसार अध्यापन करणे.त्यासाठी शाळेत पुरेशा प्रमाणात विविध प्रकारचे नाविन्यपूर्ण साहित्य असणे आवश्यक आहे.आमची शाळा आश्रमशाळा असून पाहिली ते बारावी पर्यत वर्ग आहेत त्यात पहिली ते

सातवी प्राथमिक, आठवी ते दहावी माध्यमिक, व अकरावी ते बारावी उच्च माध्यमिक असे वर्ग आहेत परंतु मी प्राथमिक विभागात असल्याने आमच्या प्राथमिक विभागात शाळेत एकूण सात वर्गखोल्या आहेत .शाळेत ३४५ विद्यार्थी प्राथमिक शिक्षण घेत आहेत.दैनंदिन अध्यापन करतांना एक बाब प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे विद्यार्थ्यांची निरसता. विद्यार्थ्यांना अध्ययनात गोडी वाटावी व त्यांनी स्व-कृतीतुन अध्ययन करावे या करिता काहीतरी नाविन्यपूर्ण बाबी कराव्यात असे वाटले.व त्याचा दैनंदिन अध्ययन अध्यापन प्रक्रियेत नियमित वापर करायचा ठरवले.त्या नुसार सन २०१८- १९ या शैक्षणिक

**मराठी मासिक**
**शिक्षणयात्री**
हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक -शैला नंदकिशोर हजारे Reg No.



वर्षात इयत्ता पहिलीच्या वर्गासाठी दरमहा दोन नाविन्यपूर्ण उपक्रम घेण्याचा निर्धार केला व वर्षभरात १८ते २० नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले. नमुना दाखल मी दोन नवोपक्रम सादर करित आहे.

**उपक्रमाचे नाव -** हजेरी घेतांना येस सर ऐवजी वर्गातील वस्तूंची मराठी किंवा इंग्रजीत नावे सांगणे.

उपक्रमाचा उद्देश –

वर्गातील विद्यार्थीची मराठी भाषेतील शब्द संपत्ती वाढावी . साहित्य वर्गातील वस्तू, साहित्याचा खर्च काहीही नाही, कार्यपद्धती – माझ्या वर्गातील विद्यार्थी हे आदिवासी भागातील असल्याने त्यांची बोलीभाषा आदिवासी पावरा, नयरी आहे म्हणून मराठी भाषेतील बरेच शब्द ते अपरिचित आहेत.म्हणून दररोज हजेरी घेतांना वर्गातीलविविध वस्तू किंवा चित्रांचे नाव सांगतात त्यामुळे त्यांची मराठी भाषेची शब्द संपत्ती वाढते. दररोज हजेरी घेतांना विद्यार्थी वर्गातील विविध वस्तू किंवा चित्रांचे नाव सांगतात. उपक्रमाचा उद्देश – विद्यार्थ्यांना अंक व अक्षराचे मुळ आकारानुसार लेखन करता यावे. साहित्य विद्यार्थ्यांना अंकाचे व अक्षराचे आकार योग्य पद्धतीने गिरवता यावे यासाठी मुलांना शालेय मैदानावर दररोज एक तास याप्रमाणे त्यांना शालेय मैदावरील दगडांपासून विविध आकार बनविण्यास सांगितले.मुले आनंदाने त्यात रमतात व विविध आकार बनवतात.अशाच प्रकारे त्यांना अंक व मुळाक्षरांचे आकार बनविण्यास सांगितले मुले आनंदाने उपक्रम करतात.

## या महिन्यातील विज्ञान दिन...

६ जानेवारी : ग्रेग्रॉर योहान मेंडेल : ऑस्ट्रियन जीवशास्त्रज्ञ
जन्म: २२ जुलै १८२२ मृत्यू : ६ जानेवारी १८८४
अनुवंशिकता शास्त्राचा पाया घातला.

८ जानेवारी : गॅलिलियो गॅलिली : इटालियन खक्षोलशास्त्रज्ञ
जन्म : १५ फेब्रुवारी १५६४ मृत्यू : ८ जानेवारी १६४२

१० जानेवारी : कॅरोलस लिंन्नेयुस :स्वीडीश जीवशास्त्रज्ञ
जन्म: २३ मे १७०७ मृत्यू : १० जानेवारी १७७८
वनस्पती व प्राणी यांचे शास्त्रीय वर्गीकरण

१४ जानेवारी : एडमंड हॅले : इंग्लिश खगोलशास्त्रज्ञ
जन्म : ८ नोव्हेंबर१६५६ मृत्यू : १४ जानेवारी १७४२
धुमकेतू (हॅलेचा) दर ७५ ७६ वर्षांनी दिसण्याचे वर्तमान.

## सन २०२० मध्ये राष्ट्रपुरूष/थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत....

**संकेतांक : २०१९१२१३१५३५५३६९०७**

| अ.क्रं. | जयंती/राष्ट्रीय दिन | इंग्रजी महिना व दिवस | वार | भारतीय महिना व दिवस | कार्यक्रमाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सावित्रीबाई फुले जयंती | ३ जानेवारी, २०२० | शुक्रवार | १३ पौष,शके १९४१ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे |
| २ | जिजाऊ माँ साहेब जयंती | १२ जानेवारी,२०२० | रविवार | २२ पौष,शके १९४१ | – |
| ३ | स्वामी विवेकानंद जयंती | १२ जानेवारी,२०२० | रविवार | २२ पौष,शके १९४१ | – |
| ४ | नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती | २३जानेवारी २०२० | गुरूवार | ०३माघ, शके १९४१ | – |
| ५ | संत रविदास महाराज जयंती | ९ फेब्रुवारी,२०२० | रविवार | २० माघ,शके १९४१ | – |
| ६ | संत सेवालाल महाराज जयंती | १५ फेब्रुवारी,२०२० | शनिवार | २६ माघ,शके १९४१ | – |
| ७ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी,२०२० | बुधवार | ३०माघ,शके १९४१ | – |
| ८ | संत गाडगेबाबा महाराज जयंती | २३ फेब्रुवारी,२०२० | रविवार | ४फाल्गुन,शके १९४१ | – |
| ९ | यशवंतराव चव्हाण जयंती | १२ मार्च,२०२० | गुरूवार | २२ फाल्गुन,शके१९४१ | – |
| १० | शहीद दिन | २३ मार्च,२०२० | सोमवार | ३चैत्र,शके१९४२ | |
| ११ | महात्मा ज्योतिबा फुले जयंती | ११ एप्रिल,२०२० | शनिवार | २२ चैत्र,शके१९४२ | – |
| १२ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल,२०२० | मंगळवार | २५ चैत्र,शके १९४२ | – |
| १३ | महात्मा बसवेश्वर जयंती (तिथी) | २६ एप्रिल,२०२० | रविवार | ६वैशाख,शके१९४२ | – |
| १४ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती | ३० एप्रिल,२०२० | गुरूवार | १०वैशाख,शके१९४२ | – |
| १५ | दहशतवाद हिंसाचार विरोधीदिवस | २१ मे,२०२० | गुरूवार | ३१वैशाख,शके१९४२ | – |
| १६ | महाराणाप्रतापसिंह जयंती (तिथी) | २५मे,२०२० | सोमवार | ४ज्येष्ठ,शके१९४२ | – |
| १७ | स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती | २८ मे,२०२० | गुरूवार | ७ ज्येष्ठ,शके १९४२ | – |
| १८ | अहिल्यादेवी होळकर जयंती | ३१मे,२०२० | रविवार | १०ज्येष्ठ,शके१९४२ | – |
| १९ | राजर्षि शाहू महाराज जयंती | २६जुन,२०२० | शुक्रवार | ०५आषाढ,शके१९४२ | – |
| २० | वसंतराव नाईक जयंती | १ जुलै, २०२० | बुधवार | १०आषाढ,शके१९४२ | – |
| २१ | लोकमान्य टिळक जयंती | २३जुलै,२०२० | गुरूवार | ०१श्रावण,शके १९४२ | – |
| २२ | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती | १ ऑगस्ट२०२० | शनिवार | १०श्रावण,शके१९४२ | – |
| २३ | क्रांतिसिंह नानापाटील जयंती | ३ऑगस्ट,२०२० | सोमवार | १२श्रावण,शके१९४२ | – |
| २४ | सद्भावना दिवस | २०ऑगस्ट,२०२० | गुरूवार | २९श्रावण,शके१९४२ | सदभावना दिवसाचीशपथ |


(उर्वरीत पान क्रं.१७ वर)

# बालसाहित्यातील नवप्रयोग




आबा महाजन यांच्या बालकुमार कवितांचा बंजारा बोली भाषेत जिल्हा परिषद शाळेतील मुलांनी केलेला हा अनुवाद महाराष्ट्रातील पहिलाच प्रयोग...

मा. दिनकर गांगल (संस्थापक, ग्रंथाली प्रकाशन)







आबा महाजन हे बाल साहित्यात रमलेले नाव असून ते शिरपूर जि.धुळे येथे तहसिलदार म्हणून कार्यरत आहेत...


संपादन : युवराज माने
प्रकाशन : मधुराज पब्लिकेशन्स प्रा.लि.
२५१,क, शनिवारपेठ पुणे-४११०३०
दूरध्वनी क्रं.२४४७१७२३/ २४४८३९९५


Reg No. MAHMAR2015/67226

शिक्षण यात्री

Postal Registration No.DHL/557/2018-20




# सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ३५० रूपये      द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये      त्रैवार्षिक वर्गणी-. १००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

विजया बँक (राष्ट्रीय कृत) No--512700301000129   Ifsc-VIJB0005127

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मुपोता-शिरपुर जि-धुळे ४२५४०५

प्रेषक
संपादक -२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

प्रती, ................................................
..........................................................
..........................................................

Pragati Arts Shirpur 8421356261